। लातूर । वर्ष ३५ वे । अंक ११४ वा । मंगळवार, दिनांक २१ जुलै २०२६ । पृष्ठे ६ । किंमत १ रू.

RNI 47034/64

# लातूर समाचार

LATUR SAMACHAR

Email-dainiklatursamachar@gmail.com

(सांज दैनिक)

प्रकाशन: लातूर

पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक) कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

# पेपरफुटी हे मोठ पाप, आम्ही दोषींना सोडले नाही;

## पंतप्रधान मोदींनी संसदीय दलाच्या बैठकीत मांडली भूमिका !



**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नीट पेपरफुटी प्रकरणावर भाष्य केले. पावसाळी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर एनडीएच्या संसदीय दलाची बैठक पार पडली. यावेळी पंतप्रधान मोदी म्हणाले की, या प्रकरणात सरकारने तात्काळ कारवाई केली आणि जबाबदारी असलेल्या लोकांना अटक केली आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, पंतप्रधान मोदी बैठकीत म्हणाले की, या प्रकरणात जे लोक सहभागी होते, त्यांना अटक केले आहे. आतापर्यंत १३ लोकांना अटक करण्यात आली आहे. जो लोक जबाबदार आहेत, त्यांच्यावर सर्वात कठोर कारवाई केली गेली पाहिजे, जेणेकरून भविष्यात कुणीही असे करण्याचे धाडस करणार नाही.

**परीक्षा पद्धती सुरक्षित करावी लागेल**


पंतप्रधान मोदी असेही म्हणाले की, विद्यार्थ्यांच्या भविष्याशी संबंधित कोणताही विषय हलक्यात घेता येणार नाही. राज्य सरकारांनी परीक्षा पद्धती सुरक्षित करायला हवी. पेपरफुटीसारख्या घटना घडू नये म्हणून परीक्षा पद्धत आणखी मजबूत करावी लागेल. पेपरफुटी प्रकरणाचे तीव्र पडसाद दिल्लीत उमटल्यानंतर पंतप्रधान मोदी यांनी हे विधान केले आहे. दिल्लीत २० जुलै रोजी विद्यार्थी आणि तरुणांनी पेपरफुटी प्रकरणावरून मोर्चा काढला. त्याचबरोबर संसदेतही या विषयावरून गोंधळ झाला. अशा पार्श्वभूमीवर मोदींनी सरकारची भूमिका मांडली आहे.

**'पेपरफुटी टाळण्यासाठी एकत्र काम करायला हवे'**

**पंतप्रधान मोदी म्हणाले की, जबाबदार लोकांना पकडल्यानंतर सरकारने पुन्हा परीक्षा घेतली आहे. पेपरफुटी प्रकरण हे भयंकर पाप आहे. पेपरफुटीच्या घटना भविष्यात घडू नये, यासाठी सर्व राज्यांनी एकत्रित मिळून काम करायला हवे, असे मोदी बैठकीत म्हणाले.**

### शेतकरी कर्जमाफीची पहिली यादी बुधवारी जाहीर होणार

# ३० जुलैपूर्वी खात्यात पैसे जमा होणार



**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील लाखो शेतकऱ्यांसाठी दिलासादायक बातमी समोर आली आहे. राज्य सरकारच्या शेतकरी कर्जमाफी योजनेअंतर्गत लाभार्थींची प्राथमिक यादी उद्या (२२ जुलै) जाहीर करण्याचा प्रयत्न सुरू असल्याची माहिती कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली. तसेच, ३० जुलैपूर्वी पात्र शेतकऱ्यांच्या कर्ज खात्यात कर्जमाफीची रक्कम जमा केली जाईल, अशी स्पष्ट ग्वाहीही त्यांनी दिली.

एका वृत्तवाहिनीशी बोलताना दत्तात्रय भरणे म्हणाले की, कर्जमाफीला विलंब होण्यामागे काही तांत्रिक आणि प्रशासकीय कारणे होती. सुरुवातीला ३० जूनपर्यंत कर्जमाफीचा लाभ देण्याचे उद्दिष्ट होते. मात्र, पावसाळी अधिवेशनातील पुरवणी मागण्यांना राज्यपालांची मंजुरी मिळणे आवश्यक होते. त्यानंतर आयकर भरणाऱ्या शेतकऱ्यांची अंतिम माहिती केंद्र सरकारकडून मिळणेही गरजेचे होते. आता हा डेटा सरकारकडे प्राप्त झाला असून प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे.

कृषिमंत्र्यांनी सांगितले की, २२ जुलै रोजी अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त प्राथमिक लाभार्थी यादी जाहीर करण्याचा प्रयत्न केला जात आहे. त्यानंतर टप्प्याटप्प्याने पात्र शेतकऱ्यांच्या कर्ज खात्यात रक्कम वर्ग केली जाईल.

**३० जुलैपूर्वी कर्ज खात्यात रक्कम**

राज्य सरकार शेतकऱ्यांच्या हितासाठी कटिबद्ध असल्याचे सांगत कृषीमंत्र्यांनी स्पष्ट केले की, ३० जुलैपूर्वी पात्र शेतकऱ्यांच्या कर्ज खात्यात कर्जमाफीची रक्कम जमा केली जाईल. त्यामुळे शेतकऱ्यांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहनही त्यांनी केले.


### बसस्थानकातून दुचाकीची चोरी

**लातूर/प्रतिनिधी :** येथील मध्यवर्ती बसस्थानक क्र. २ समोरील पार्किंगमधून एक काळ्या रंगाची 'होन्डा युनिकॉर्न' मोटारसायकल (क्र. एमएच २४ बीबी १०७५) चोरीला गेल्याची घटना घडली आहे. १३ जुलै रोजी सकाळी १० वाजेच्या सुमारास ही चोरी झाली. व्यापारी बद्रीनाथ भागीरथ भन्साळी (वय ४२, रा. मोती नगर, लातूर) यांनी पार्क केलेली सुमारे ४० हजार रुपये किमतीची ही दुचाकी अज्ञात चोराने पळवून नेली. या प्रकरणी शिवाजी नगर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०३ (२) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलीस हवालदार शेख अधिक तपास करत आहेत.

### उदगीरमध्ये दुचाकी चोरीस

**उदगीर/प्रतिनिधी :** : येथील संत कबीर नगर परिसरातून ५० हजार रुपये किमतीची होंडा शाईन मोटारसायकल (क्र. एमएच २४ बीके ६८१२) अज्ञात चोराने चोरून नेल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी फिर्यादी भगवान माधवराव चिमणचोडे (वय ५५, रा. मलकापूर, ह.मु. उदगीर) यांच्या तक्रारीवरून उदगीर ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही चोरी १५ जून ते १६ जुलै दरम्यान झाली असून, १८ जुलै रोजी याबाबत रीतसर नोंद करण्यात आली आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस अंमलदार चोले करत आहेत.

# लातूर-नांदेड हायवेवर दोन दुचाकींची भीषण धडक! एकजण जागीच ठार, दुसरा गंभीर!



**लातूर/प्रतिनिधी :** चाकूर (जि. लातूर) : तालुक्यातील घरणी येथील ग्रामीण आयटीआयसमोर शनिवारी सकाळी दोन दुचाकींची जोरदार धडक बसून भीषण अपघात झाला. त्यात एकजण जागीच ठार झाला, तर अन्य एकजण गंभीररित्या जखमी झाला असून पुढील उपचारासाठी लातूरला पाठविण्यात आले आहे.

लातूर- नांदेड महामार्गावरील घरणीजवळ शनिवारी सकाळी एमएच २४, बीसी ९६८३ व एमएच ५५, डी ७६०७ या दोन दुचाकींचा अपघात झाला. अपघाताचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नाही. अपघातात दुचाकीस्वार देविदास सखाराम चव्हाण (५०, वरवटी तांड, ता. अहमदपूर) यांचा जागीच मृत्यू झाला. तर शेख रहमान गुलाबराव (२२) हा गंभीर जखमी झाला.

त्याच्यावर चाकुरातील ग्रामीण रुग्णालय प्रथमोपचार करुन पुढील उपचारासाठी लातूरचे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात पाठविण्यात आले आहे, असे वैद्यकीय अधिकारी डॉ. संग्राम नरवटे यांनी सांगितले. घटनास्थळी पोलिस निरीक्षक बालाजी भंडे, पोलिस उपनिरीक्षक रमेश चव्हाण, पोहेकॉ. राजू वाघमारे यांनी भेट देऊन पाहणी केली. पोलिस पुढील तपास करीत आहेत.

# घरफोडीचे दोन गुन्हे उघड, 1 लाख 35 हजारांचा मुद्देमाल जप्त




**लातूर/प्रतिनिधी :** लातूर जिल्ह्यात मालमत्तेविरुद्ध होणाऱ्या गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी पोलीस अधीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेकडून सातत्याने विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. त्याच अनुषंगाने स्थानिक गुन्हे शाखेने कासारशिरसी पोलीस ठाण्यात दाखल घरफोडीच्या गुन्ह्याचा यशस्वी छडा लावत एका सराईत गुन्हेगारास अटक करून त्याच्याकडून चोरीतील १,३५,००० किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.

पोलिसाकडून मिळालेली माहिती अशी की, दि. २० जुलै रोजी पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांचे निर्देशांवर अप्पर पोलिस अधीक्षक मंगेश चव्हाण यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांच्या नेतृत्वातील पथकाने जिल्ह्यातील मालमत्तेविरुद्ध गुन्हे करणाऱ्या आरोपींचा शोध घेत असताना माहिती मिळाली की, कासारशिरसी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील घरफोडी करणारा अ बालाजी शिवाजी काळे (वय ४३ वर्षे, रा. साठे चौक, धाराशिव) यास चोरीतील सोन्याचे दागिने विक्री करण्यासाठी किल्लारी-उमरगा मार्गावरील नदीजवळील एका हॉटेल समोरून ताब्यात घेऊन अंगझडती केली असता त्याच्याकडून सोन्याचे दागिने व १०,००० रोख रक्कम, असा एकूण १,३५,००० रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला.

चौकशीदरम्यान सदरील व्यक्तीने आपल्या साथीदारांसह कासारशिरसी पोलीस ठाणे गु.र.नं. ९८/२०२६, कलम ३३१(४), ३०५(अ) भारतीय न्याय संहिता अंतर्गत दाखल घरफोडीचा गुन्हा केल्याची कबुली दिली. तसेच औराद शहाजनी पोलीस ठाणे गु.र.नं. ५२/२०२६ मधील घरफोडीचा गुन्हाही केल्याची माहिती दिली. चोरीतील काही दागिने धाराशिव येथील सराफांकडे विक्री केल्याचेही तपासात निष्पन्न झाले असून त्या अनुषंगाने पुढील तपास सुरू आहे.

जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालामध्ये विविध प्रकारच्या सोन्याच्या अंगठ्या, मनी, पान, मनगटी व पिंपळपान यांचा समावेश असून त्यासोबत चोरीतील १०,००० रोख रक्कम जप्त करण्यात आली आहे.

या कारवाईमुळे कासारशिरसी येथील घरफोडीचा गुन्हा उघडकीस आला असून आणखी काही मालमत्तेविरुद्धचे गुन्हे उघड होण्याची शक्यता आहे. अटक आरोपीस पुढील कायदेशीर कार्यवाहीसाठी कासारशिरसी पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कारवाई वरिष्ठांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांच्या नेतृत्वातील पथकामधील सपोनि पांडुरंग माने, पोलीस अंमलदार माधव लक्ष्मण बिलापट्टे,नवनाथ हासबे, तुराब पठाण, गणेश साठे, तुळशीराम बरुरे, अंजली गायकवाड, शैलेश सुडे व श्रीनिवास जांभळे यांनी केली आहे.

# मालमत्ता कराच्या व्याज शास्तीमध्ये सवलतीस ३ दिवसांची मुदतवाढ

**लातूर/प्रतिनिधी :**थकीत कराचा दि. २० जुलै पूर्वी एकरकमी भरणा करणाऱ्या नागरिकांना व्याज शास्तीमध्ये १०० टक्के सवलत देण्याचा निर्णय मनपाच्या वतीने घेण्यात आला होता. त्यानुसार ६३०० मालमत्ताधारकांकडून कर भरणा केला. उर्वरित नागरिकांच्या सोयीसाठी या सवलतीस मुदतवाढ देणे बाबत महापौर जयश्रीताई सोनकांबळे, उपमहापौर स्नेहल उटगे, स्थायी समिती सभापती सचिन बंडापल्ले, सभागृह नेते विजयकुमार साबदे,विरोधी पक्षनेते देविदास काळे यांनी प्रशासनास निर्देशित केले होते. त्यानुसार आयुक्त श्री राहुल कुलकर्णी यांनी ३ दिवसांची मुदतवाढ दिली आहे.

शहरातील बर्याच नागरिकांकडे कर थकीत आहे.नागरिकांनी हा कर वेळेत भरावा यासाठी मनपाच्या वतीने वेळोवेळी प्रयत्न केले जात आहेत. नागरिकांना कर भरणे सुलभ व्हावे यासाठी अनेकदा सवलती देण्यात आल्या होत्या. तसेच थकीत करावरील व्याजात सवलत दिनांक ६ ते २० जुलै या कालावधीत थकीत कराचा एकरकमी भरणा करणाऱ्या नागरिकांना व्याज शास्तीमध्ये १०० टक्के सवलत देण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला होता. त्यामुळे नागरिकांनी सुट योजनेचा लाभ घेवून टॅक्स भरला होता परंतु अद्यापही काही थकबाकीदार बाकी असल्याने व योजनेस मुदतवाढ देण्याची मागणी असल्याने या सवलत योजनेस आणखी ३ दिवसांची मुदतवाढ देण्यात आली आहे.त्यामुळे ज्या नागरिकांना या योजनेचा लाभ घेता आला नाही त्यांना दि. २१ ते २३ जुलै दरम्यान आपल्याकडील थकीत कराचा भरणा मनपाकडे करता येणार आहे.

नागरिकांनी या सवलत योजनेचा लाभ घेऊन आपल्याकडील थकीत कर मनपाकडे एकरकमी भरणा करावा, असे आवाहन मनपाच्या कर संकलन विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

### प्रभात किरणे

समाधानासाठी,तरुण दिसण्यासाठी नटाव
मन तरुण राहण्यासाठी सदैव दक्ष असाव
देव आणि समाधान शोधत फिरण्यापेक्षा
देव आणि सुख स्वतःमध्ये वसे ते पारखाव

– इंजि. नागनाथ कलवले

लातूर ९७६४७ ८८२८८

### कुजबुज

-डॉ. संजय जमदाडे



**कॉकरोज जनता पार्टीचे दिल्लीत आंदोलन ............**



### चिमटा दयाचा

**ॲटोरिक्षावाल्यांना कितीही नियम सांगितले तरी ते पाळतीलच असे नाही! कारण ते कोणाचे लाडाचे आहेत हे कोणाला सांगण्याची गरज नाही!!**

# दुय्यम निबंधक कार्यालयात कामबंद, तीनशेहून अधिक दस्त नोंदणी रखडली

## सरकारचा पाऊणे चार कोटींचा महसूल बुडाला, नागरिकांची गैरसोय



**लातूर/प्रतिनिधी :** पुणे येथील सह-दुय्यम निबंधक रवींद्र कोळी यांच्यावर झालेल्या हल्ल्याच्या निषेधार्थ राज्यभरातील नोंदणी व मुद्रांक विभागाच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी सोमवार, २० जुलै रोजी कामकाज बंद आंदोलन पुकारले. या आंदोलनाचा मोठा फटका लातूर जिल्ह्यातील नागरिकांना आणि पर्यायाने सरकारी महसुलाला बसला. लातूर जिल्ह्यातील सर्व दुय्यम निबंधक कार्यालयांमध्ये १०० टक्के कामबंद पाळण्यात आल्याने कोट्यवधींचे व्यवहार ठप्प झाले.

कृती समितीच्या आवाहनानुसार लातूर शहरातील नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक कार्यालय, सह-जिल्हा निबंधक कार्यालयासह जिल्ह्यातील एकूण १० दुय्यम निबंधक कार्यालयांमधील सुमारे ४२ अधिकारी व कर्मचारी या संपात सहभागी झाले होते. परिणामी, दैनंदिन नियोजित असलेल्या विविध दस्त नोंदण्यांसह कार्यालयांतर्गत होणारे सरासरी २५० ते ३०० व्यवहार पूर्णपणे ठप्प झाले.कार्यालयांच्या प्रवेशद्वारावर कामकाज बंद असल्याचे फलक लावण्यात आले होते. त्यामुळे खरेदी-विक्री, भाडेकरार आणि इतर कामांसाठी आलेल्या नागरिकांना रिकाम्या हाताने माघारी फिरावे लागले. अनेक नागरिकांनी दस्त नोंदणीसाठी पूर्वतयारी करून वेळ घेतली होती, मात्र अचानक झालेल्या या संपामुळे त्यांचे मोठे आर्थिक आणि मानसिक नुकसान झाले. या संपामुळे एकाच दिवसात शासनाचा पावणे चार कोटी रुपयांचा महसूल बुडाला आहे.

वाद टाळण्यासाठी प्रशासकीय पातळीवर काही बदल करण्याची मागणी कर्मचाऱ्यांनी केली आहे. शासनाने नोंदणीकृत दस्तांनुसार आवश्यक कागदपत्रांची अधिकृत 'चेक लिस्ट' प्रसिद्ध करावी, जेणेकरून पक्षकार आणि कर्मचारी यांच्यात वाद होणार नाहीत. तसेच, रिक्त पदे तातडीने भरावीत, 'एक जिल्हा एक नोंदणी' धोरण रद्द करावे आणि संपूर्ण राज्यातील वेळा समान कराव्यात, अशी मागणी केली.

नोंदणी व मुद्रांक विभागाच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांन ी केलेल्या कामबंद आंदोलनामुळे दररोज जिल्ह्याभरातील विविध कार्यालयांतर्गत होणारे दस्त नोंदणी सरासरी २५० ते ३०० व्यवहार हे १०० टक्के ठप्प झाले. यामध्ये सर्वाधिक फटका हा लातूर येथील दोन कार्यालये आणि उदगीर या तीन कार्यालयांतर्गत होणारे सरासरी १५० कामे थांबली. जी. बी. सातदिवे, सह. जिल्हा निबंधक तथा मुद्रांक जिल्हाधिकारी.

संपामुळे लातूर जिल्ह्यातील सर्व दुय्यम निबंधक कार्यालये दिवसभर ओस पडली होती. पूर्वतयारी करून आणि दस्त नोंदणीसाठी नियोजित वेळ घेऊन आलेल्या अनेक नागरिकांना प्रवेशद्वारावरील फलक पाहून रिकाम्या हाताने माघारी फिरावे लागले.

सर्व कार्यालयांना 'एमएसएफ'चे रक्षक पुरवावेत आणि सीसीटीव्ही बसवावेत, अशी प्रमुख मागणी आहे. पुण्याच्या घटनेत संबंधित पोलीस अधिकारी स्वाती देवधर यांनी जामीनपात्र गुन्हा नोंदवून आरोपीस मदत केल्याचा आरोप संघटनेने केला आहे.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ॥

# लातूर समाचार

## केंद्राचे पावसाळी अधिवेशन सुरु

केंद्र सरकारचे पावसाळी अधिवेशनास सुरवात झाली. अधिवेशन म्हटले की, गोंधळ आला असे आता मानले जात आहे. अधिवेशन लोकशाही साठी किती महत्वाचे आहे हे अनेकांना काळाले नसेल. अधिवेशनात अनेक प्रश्नाची सोडवणुक होते. आपल्या मतदार संघात विकास करून घ्यावायाचा असेल तर सोपा व सरळ मार्ग अधिवेशन आहे. देशात अधिवेशन मग राज्याचे असो किंवा केंद्राचे असो गोंधळ ठरलेला आहे. कामकाज चालूच द्यावयाचे नाही. असा विचार करून गोंधळ घातला जातो की काय असे वाटायाला लागले आहे. विरोधक शांततेत सहभाग होत नाहीत. एकमेकाच्या म्हणजे सत्ताधारी व विरोधक मिळून कामकाज चालविले पाहिजे. काही झाले तरी भरपूर कामे होतात. कामच करू द्यावयाचे नाही असे ठरवुन होत असेल तर ते योग्य नाही. लोकसभेचे अधिवेशन सर्वाधिक महत्वाचे असते कारण यात अनेक विधेयकास मंजुरी हवी असते. कायदे तयार करण्यासाठी अधिवेशनाची मोठी गरज भासते. चर्चा करून काही त्रुटी असतील तर त्यात सुधारणा केली जाते. दोन सभागृहात चर्चा होवून विघेयकास मंजुरी मिळते. लोकशाहीतील ही प्रक्रियेस सदस्यांची उपस्थिती व चर्चा महत्वाची ठरते. चर्चा करूनच सर्वानुमते विधेयक मंजूर होतात. अधिवेशच चालू न देणे. बहिष्कार घालणे योग्य नाही. कशासाठी सभात्याग करता. कारण ज्या भागातील मतदार संघाचे प्रतिनिधीत्व करण्याची जबाबदारी असते. चर्चेत सहभाग होण्यासाठी सभागृह चालविले पाहिजे. सहभागी झाले पाहिजे. त्याच प्रमाणे आपल्या मतदार संघातील तक्रारीची नोंद केली पाहिजे. सर्वांनाच भरपूर असा वेळ मिळतोच असा नाही. अधिवेशनाचा काळ व पक्षाबलीय संख्या हे पाहून वेळ मिळत असतो. कमी वेळेत भरपूर असे पदरात पाडून घेतले पाहिजे. केवळ कामकाज चालूच द्यायचे नाही किंवा आडथळा, कामकाज तहकुब करणे हे आर्थिकदृष्टया परवडणारे नाही. आर्थिक नुकसान जनतेचे होते. पैसा जनतेचा वाया जातो हे लक्षात घेतले पाहिजे. विरोधकांचे संख्याबळ कमी आहे असे असले तरी ते कामकाज वारंवार तहकुब करण्यात भाग पाडतात हे काही योग्य नाही, सभागृह तहकुब करणे तसे योग्य नाही याचा विचार झाला पाहिजे. त्याच प्रमाणे अविशेनाच्या काळात मोर्चे अधिक निघतात. राज्यात मुंबई व नागपूर अधिवेशनाच्यावेळी मोठया संख्येचे मोर्चाचे आयोजन होते. त्यामुळे एकतर विविध भागातून,मतदार संघातून सदस्य येतात. मंत्री येतात. त्यांची सुरक्षा महत्वाची असते. मोर्चा अधिवेशनकाळातील संख्यात्मक मोठे असल्याने त्यांना सांभाळणे अवघड काम असते. विविध ठिकाणाहून आलेली जनता ही शांत विचाराची असते असे नाही, त्यामुळे त्यांना सांभाळणे अतिषय आवघड असे काम पोलिस यंत्रणेस करावे लागते. अधिवेशन ठराविक काळात घेतले जाते. त्यात जनतेच्या प्रश्नाची सोडवणुक होणे आवश्यक आहे. जनतेच्या प्रश्नाची सोडवणुक म्हणून लोकप्रतिनिधी निवडलेले असतात. सरकार व जनतेमधीन प्रतिनिधी सदस्य मंडळी, म्हणजे खासदार, आमदार, नगरसेवक आदि कार्यरत असतात. सभागृहच चालले नाही. कामकाजच झाले नाही तर प्रश्नाची सोडणुक कशी होणार? सोमवारी पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी जो गोंधळ पाहावयास मिळाला तो दुःखदायक ठरणारा आहे. वास्तविक युवकांचा आवाज सरकार दाबत आहे असे लोकसभेत विरोधीपक्षाकडून मल्लिकार्जुन खरगे यांनी जोरदार टिका केली आहे. देशात जे काही चालले आहे ते समाधान कारक नाही. राममंदिरातील चोरी, पेपर फुटी, वाढलेली महागाई हे चिंतेचे विषय आहेत. कोणत्याही स्थितीत असे प्रकार होता कामा नये. कोणत्याबाबीमुळे सत्ताधाऱ्याकडून चुका होत असून तो विरोधकांच्या हातात पडत आहेत. जनतेचे प्रश्न घेवून विरोधक आकमक होत आहेत. वास्तविक ज्याबाबी देशात घडत आहेत त्या योग्य नाहीत. पेपर फुटी तर सर्वात वाईट बाब आहे. सरकारकडून मोठ्या प्रमाणात अशा प्रकरणाबाबत लक्ष असणे आवश्यक आहे. केवळ सरकारचे देशात लक्ष नाही असे वाटणे स्वभाविक आहे. सर्वात मोठे चुकीची बाब पेपर फुटीची आहे. नीट त्याच प्रमाणे टीईटीचा पेपर लिक होणे म्हणजे बेजबाबदरीचे लक्षण आहे. सध्याला वचक राहीली नाही, भीती राहीली नाही. यामुळे पेपर लिक होणे, धामिक स्थळात चोरी करणे, युवकाचा उद्रेक असा प्रकार होताना दिसून येत आहे. त्यामुळे जनतेच्या प्रश्नाची उकल होणे स्वाभाविक आहे. लोकप्रतिनिधीनी आवाज अधिवेशनकाळात उठविणे आवश्यक आहे. त्यासाठी सभागृहात कामकाज शांततेत चालणे आवश्यक आहे. गोंधळ काही कामाचा नाही. यात पैसा व वेळ वाया घालण्यासारखे आहे. त्यामुळे लोकप्रतिनिधीने आता जनतेच्या प्रश्नासाठी सभागृहाचे कामकाज चालण्यासाठी आचारसंहीत ठरवावी. त्यानुसार चालले तरच कामकाज चालू शकेल. सभागृहाच्या बाहेर काही मंडळी कुट-कारस्थान करीत आहेत. संसदीय कामकाज चालले पाहिजे. संसदीय नियमानुसार कामकाज झाले पाहिजे. एखादा व्यक्ती देशात अशांतता माजावी. यासाठी नवा पक्ष काढतात. संसदीय पद्धतीने कामकाज होण्याएवजी चुकीच्या मार्गाचा आवलंब होत असेल तर ते योग्य नाही. त्यामुळे जनतेला जे पटते, ते करावे. पक्षाने जनतेच्या प्रश्नाची सोडवणुक व्हावी यासाठी प्रयत्न करावा. त्याच प्रमाणे लोकप्रतिनिधी म्हणून काम करताना पहिल्यांदा आपल्या मतदार संघात काम व्हावे यासाठी प्रयत्न करावा. एकही दिवस व तास वाया जाणार नाही याची खबरदारी घेतली पाहिजे. जे प्रश्न चर्चेतून सुटणे आवश्यक आहे. ते भांडणातून सुटले जात नाहीत. लोकशाहीत सत्ताधाऱ्यास जेवढे महत्त्व आहे तेवढे महत्व विरोधकांधी सदस्यांना आहे. हे लक्षात घेतले पाहिजे. विरोधकांनी आता विचार करून, सर्वजन एकत्र येवून कोणत्याही परिस्थिती कामाकाज पुर्ण वेळ व काळ चालले पाहिजे. जनतेच्या पैसा वाया जावू न देणे या बाबीचा विचार करून चालणे आवश्यक आहे.

# ‘कानडा राजा पंढरीचा’मधून आषाढी एकादशीनिमित्त विठ्ठलभक्तीचा सुरेल जागर

## सांस्कृतिक कार्य संचालनालयातर्फे २५ जुलै रोजी मुंबईत विशेष सांगीतिक कार्यक्रमाचे आयोजन

**मुंबई/प्रतिनिधी :** सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्यावतीने आषाढी एकादशीनिमित्त ‘कानडा राजा पंढरीचा’ या विशेष सांगीतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. शनिवार, दि. २५ जुलै २०२६ रोजी सायंकाळी ६.०० वाजता रंगशारदा, वांद्रे (पश्चिम), मुंबई येथे हा कार्यक्रम सादर होणार आहे. ‘कानडा राजा पंढरीचा’ हा महाराष्ट्राच्या समृद्ध भक्तीपरंपरेचा आणि वारकरी संप्रदायाच्या सांस्कृतिक वारशाचा सुरेल आविष्कार आहे. विठ्ठलभक्ती, संतपरंपरा आणि अभंगसंगीत यांच्या माध्यमातून रसिकांना भक्तिरसपूर्ण सांगीतिक अनुभव देण्याचा प्रयत्न या कार्यक्रमातून करण्यात आला आहे. आषाढी एकादशीच्या निमित्ताने विठ्ठलनामाच्या भक्तीभावात रसिकांना चिंब करणारा हा विशेष सांगीतिक सोहळा ठरणार आहे.

या कार्यक्रमात प्रसिद्ध गायक प्रथमेश लघाटे आणि मुग्धा वैशंपायन यांच्या सुमधुर आवाजातून भक्तिगीते, अभंग आणि विठ्ठलभक्तीपर रचनांचे सादरीकरण करण्यात येणार आहे. संगीत संयोजन निरंजन लेले यांचे असून, कार्यक्रमाचे निवेदन मिलिंद कुलकर्णी करणार आहेत. सचिन सावंत, अथर्व आठल्ये, संतोष दिवेकर, अमित गोठीवरेकर आणि संदीप कुलकर्णी हे वादक कलाकार कार्यक्रमात साथसंगत करणार आहेत. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि आध्यात्मिक जीवनात आषाढी एकादशी, तसेच पंढरपूरची वारी यांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम आणि संतपरंपरेतील संतांच्या अभंगवाणीने महाराष्ट्राच्या भक्तीपरंपरेला समृद्ध केले आहे. या समृद्ध भक्तीपरंपरेचा आणि सांस्कृतिक वारशाचा परिचय नव्या पिढीला करून देण्याच्या उद्देशाने ‘कानडा राजा पंढरीचा’ या विशेष सांगीतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

हा सांस्कृतिक उपक्रम सांस्कृतिक कार्य, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता मंत्री ड. आशिष शेलार यांच्या संकल्पनेतून आणि सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला आहे. महाराष्ट्राच्या समृद्ध सांस्कृतिक परंपरेचे जतन, संवर्धन आणि प्रसार करण्याबरोबरच भक्तिसंगीत, संतपरंपरा आणि सांस्कृतिक वारसा अधिकाधिक रसिकांपर्यंत पोहोचावा, या उद्देशाने सांस्कृतिक कार्य संचालनालयामार्फत विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे सातत्याने आयोजन करण्यात येत आहे. या कार्यक्रमास प्रवेश विनामूल्य असून, मुंबई व परिसरातील विठ्ठलभक्त, वारकरी, संगीतप्रेमी, कला रसिक तसेच नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या भक्तिरसपूर्ण सांगीतिक अनुभवाचा लाभ घ्यावा, असे आवाहन सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक श्रीराम पांडे यांनी केले आहे.




# मराठी भाषा जतन आणि संवर्धनासाठी प्रभावी कृती आराखडा राबवा – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली राज्य मराठी विकास संस्थेच्या नियामक मंडळाची बैठक




**मुंबई/प्रतिनिधी :** मराठी भाषा, साहित्य आणि बोलींच्या जतन आणि संवर्धनासाठी प्रभावी कृती आराखडा तयार करून त्याची अंमलबजावणी करावी; तसेच राज्य मराठी विकास संस्थेच्या कामकाजात सातत्य, पारदर्शकता आणि परिणामकारकता यावी यासाठी वर्षभरातील सर्व वैधानिक बैठकींचे वेळापत्रक आगाऊ निश्चित करावे, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. सह्याद्री अतिथीगृह येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली राज्य मराठी विकास संस्थेच्या नियामक मंडळाची बैठक झाली, त्यावेळी ते बोलत होते. मराठी भाषा मंत्री डॉ. उदय सामंत, मराठी भाषा विभागाचे सचिव डॉ.किरण कुलकर्णी, राज्य मराठी विकास संस्थेचे संचालक डॉ. श्यामकांत देवरे, साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्ष डॉ.सदानंद मोरे, भाषा संचालक अरुण गीते; तसेच राज्य मराठी विकास संस्थेचे अशासकीय सदस्य प्रत्यक्ष व दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठकीस उपस्थित होते.

राज्य मराठी विकास संस्थेची सर्व वैधानिक अनुपालने पूर्ण झाल्याबद्दल मुख्यमंत्री फडणवीस यांनी संस्थेचे अभिनंदन केले. ते म्हणाले की, संस्थेचा गेल्या काही वर्षांचा प्रशासकीय व वैधानिक अनुशेष (बॅकलॉग) पूर्ण झाल्याने संस्थेची प्रशासकीय रचना अधिक सक्षम झाली आहे. आता मराठी भाषेचा प्रचार, प्रसार, संशोधन आणि संवर्धन यासाठी ठोस धोरणे राबविण्यावर भर देणे आवश्यक आहे. संस्थेच्या कर्मचाऱ्यांचे प्रलंबित प्रश्नही सकारात्मक भूमिकेतून सोडविण्यात येतील.

बैठकीत सदस्यांनी मराठी भाषा आणि विविध बोलींच्या संवर्धनासाठी अनेक महत्त्वपूर्ण सूचना मांडल्या. ‘पुस्तकांचे गाव’ आणि ‘पेटी वाचनालय’ उपक्रमांचा विस्तार करून आदिवासी व सीमावर्ती भागातील मराठी शाळांपर्यंत दर्जे दार साहित्य पोहोचविणे, झाडीबोली आणि पूर्व विदर्भातील नाट्यपरंपरेच्या जतनासाठी गडचिरोली–वडसा परिसरात नाट्य संकुल उभारणे, भारुड, गोंधळ, पोवाडा यांसारख्या लोककलांच्या माध्यमातून मराठीचा वारसा जपणे; तसेच बालसाहित्य आणि बालग्रंथालयांना प्रोत्साहन देण्याबाबत सूचना मांडल्या. या सर्व सूचनांचा सकारात्मकतेने विचार करण्यात येणार असल्याची मुख्यमंत्र्यांनी ग्वाही दिली.

तंजावर येथील मोडी लिपीतील सुमारे १५ लाख ऐतिहासिक कागदपत्रांच्या डिजिटायझेशन प्रकल्पाच्या प्रगतीचा मुख्यमंत्री फडणवीस यांनी आढावा घेतला; तसेच लंडन येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या नावाने उभारण्यात येणाऱ्या जागतिक मराठी केंद्राच्या कामालाही गती देण्याबाबत यावेळी चर्चा झाली. मंत्री सामंत यांनी सांगितले की, मराठी भाषेचा जागतिक स्तरावर प्रसार करण्यासाठी ७५ आंतरराष्ट्रीय बृहन्महाराष्ट्र मंच उभारण्याची प्रक्रिया सुरू आहे. जवाहरलाल नेहरू विद्यापीठात कुसुमाग्रज यांच्या नावाने अध्यासन केंद्र; तसेच छत्रपती शिवाजी महाराजांच्या गनिमी काव्यावर पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू करण्यात आला आहे. विविध भारतीय आणि जागतिक भाषांतील दर्जेदार साहित्य मराठीत उपलब्ध करून देण्यासाठी यशवंतराव चव्हाण यांच्या नावाने ‘अनुवाद समिती’ स्थापन करण्याचाही निर्णय घेण्यात आला आहे.

## सेन्सेक्स ६५० हून अधिक अंकांनी घसरला ; निफ्टी २४,२०० च्या खाली

आठवड्याच्या पहिल्याच दिवशी शेअर बाजाराची सुरुवात घसरणीने झाली. सोमवार, २० जुलै रोजी, बीएसई सेन्सेक्स ६५० हून अधिक अंकांनी घसरला, तर एनएसई निफ्टी २४,२०० च्या खाली गेला.

सुरुवातीच्या व्यवहारात जवळपास सर्वच क्षेत्रांमध्ये विक्रीचा दबाव दिसून आला, ज्यात बँकिंग, आयटी आणि ऑटो क्षेत्रातील शेअर्सवर सर्वाधिक दबाव होता.

**शेअर बाजारात घसरण कशामुळे झाली?**

तज्ज्ञांच्या मते, बाजारातील घसरणीमागे अनेक प्रमुख कारणे आहेत. सर्वात महत्त्वाचे कारण म्हणजे अमेरिका आणि इराण यांच्यातील वाढता तणाव. या तणावामुळे कच्च्या तेलाच्या किमती वाढल्या असून, गुंतवणूकदारांची चिंता वाढली आहे. याशिवाय, परदेशी बाजारांकडून मिळणाऱ्या कमकुवत संकेतांमुळे देशांतर्गत बाजारावरही दबाव आला.

**सर्वाधिक दबावाखाली बँकिंग शेअर्स**

सोमवारी बँकिंग क्षेत्रात सर्वाधिक विक्रीचा दबाव दिसून आला. काही प्रमुख बँकांचे पहिल्या तिमाहीचे निकाल बाजाराच्या अपेक्षा पूर्ण करू शकले नाहीत, ज्यामुळे गुंतवणूकदारांनी बँकिंग शेअर्समध्ये नफा कमावला. याचा परिणाम सेन्सेक्स आणि निफ्टी या दोन्हीवर झाला.

**कच्च्या तेलाच्या किमतींमुळे चिंता वाढली**

ब्रेंट क्रूडच्या किमती प्रति बॅरल ९० डॉलरच्या वर गेल्याने गुंतवणूकदारांची चिंता वाढली आहे. भारत आपल्या कच्च्या तेलाच्या गरजांपैकी बहुतांश तेल आयात करतो. परिणामी, तेलाच्या वाढत्या किमतींमुळे महागाई वाढण्याचा धोका निर्माण झाला आहे, ज्याचा परिणाम कंपन्यांच्या नफ्यावर आणि अर्थव्यवस्थेवर होऊ शकतो.

**रुपयाच्या कमजोरीचाही बाजारावर परिणाम**

बाजारावरील दबावाला कारणीभूत ठरणारा आणखी एक घटक म्हणजे रुपयाची कमजोरी आणि बॉण्डवरील वाढते उत्पन्न (यील्ड्स). अशा परिस्थितीत, परदेशी गुंतवणूकदार अधिक जोखमीच्या मालमत्तांपासून दूर राहतात, ज्यामुळे शेअर बाजारात विक्री वाढते.

**कोणत्या क्षेत्रांमध्ये किंचित तेजी दिसून आली?**

आयटी, बँकिंग आणि ऑटो क्षेत्रातील शेअर्स दबावाखाली राहिले असले तरी, काही ऊर्जा आणि फार्मास्युटिकल क्षेत्रातील शेअर्समध्ये खरेदी दिसून आली. रिलायन्स इंडस्ट्रीजच्या शेअर्समध्येही तेजी आली, ज्यामुळे बाजाराला काहीसा आधार मिळाला, परंतु घसरण थांबवण्यासाठी ते पुरेसे नव्हते.



## चीनमध्ये ‘नाईकी’ला मोठा झटका; थेट विक्री घटल्याने शेअर्स ७ टक्क्यांनी घसरले!

स्निकर्स आणि क्रीडा साहित्य क्षेत्रातील दिग्गज कंपनी ‘नाईकी’ला चीनमधील कमकुवत मागणीमुळे पुन्हा एकदा विक्रीत घसरणीचा सामना करावा लागला आहे. व्यावसायिक आव्हाने असूनही कंपनीचे आर्थिक निकाल अपेक्षेप्रमाणे लागले आहेत. मात्र, बाजार बंद झाल्यानंतर नाईकीच्या शेअर्समध्ये ७ टक्क्यांहून अधिक घसरण नोंदवली गेली.

नाईकीने चौथ्या तिमाहीत १.०७ अब्ज डॉलर्स (प्रति शेअर ७२ सेंट्स) नफा जाहीर केला आहे, जो गेल्या वर्षी याच तिमाहीत २११ दशलक्ष डॉलर्स होता. या नफ्यामध्ये आंतरराष्ट्रीय आपत्कालीन आर्थिक शक्ती कायद्याच्या (आयईईपीए) शुल्क वसुलीमुळे मिळालेल्या ५२ सेंट्सच्या वाढीचा समावेश आहे. विश्लेषकांनी प्रति शेअर १२ सेंट्स कमाईचा अंदाज वर्तवला होता. दरम्यान, कंपनीचा महसूल १ टक्क्याने घसरून १०.९७ अब्ज झाला आहे.

नाईकीची थेट विक्री ७ टक्क्यांनी घटली असली, तरी घाऊक विक्रीत ४ टक्क्यांची वाढ झाली आहे. उत्तर अमेरिकेत विक्री ३ टक्क्यांनी वाढली, मात्र चीनच्या बाजारपेठेत कंपनीला तब्बल १२ टक्क्यांची मोठी घसरण सोसावी लागली आहे. तसेच ‘कॉन्व्हर्स’ ब्रँड आणि स्पोर्ट्सवेअर उत्पादनांच्या विक्रीतही अडचणी येत आहेत.

सन २०२४ मध्ये कंपनीत परतलेले मुख्य कार्यकारी अधिकारी इलियट हिल यांच्या नेतृत्वाखाली नाईकी सध्या पुनरुज्जीवन योजनेवर काम करत आहे. महसुलाच्या आघाडीवर आव्हाने असली, तरी ‘परफॉर्मन्स प्रॉडक्ट्स’मधील प्रगती उत्साहवर्धक असल्याचे सीईओ हिल यांनी सांगितले. दरम्यान, नाईकीने आपल्या आर्थिक रचनेत मोठे बदल करत फायझरचे सध्याचे सीएफओ डेव्हिड डेंटन यांची नवीन मुख्य आर्थिक अधिकारी म्हणून नियुक्ती केली आहे. ते १७ ऑगस्ट रोजी मॅथ्यू फ्रेंड यांची जागा घेतील.

NIKE

# नव्या शुल्काचा धोका






पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना ट्रम्प 'मित्र' म्हणत असले तरी ते व्यवहाराला जास्त महत्त्व देतात हे वारंवार सिद्ध झाले आहे. अमेरिकेला अजून पर्यंत ठाम प्रत्युत्तर भारत देऊ शकलेला नाही. रशियाकडून जे देश खनिज तेल विकत घेत आहेत त्या देशांवर १०० टक्के आयात शुल्क लादण्याची तरतूद असलेले विधेयक अमेरिकेच्या सिनेट या सभागृहात मांडण्यात आले आहे. जर ते मंजूर झाले तर त्याचा फटका चीन बरोबरच भारतासही बसेल. हे विधेयक मांडण्यामागे युक्रेन विरुद्धच्या युद्धासाठी रशियाला निधी मिळू नये हा हेतू असल्याचे सांगण्यात येत आहे. स्लोव्हाकिया, हंगेरी व अझरबैजान याही देशांना या विधेयकात लक्ष्य करण्यात आले आहे. मात्र युरोपीय देशांना वगळण्यात आले आहे. तेथे सत्तेत असलेल्या रिपब्लिकन पक्षाचे सिनेटर लिंडसे ग्रॅहम आणि विरोधी डेमोक्रॅट पक्षाचे रिचर्ड ब्लूमेन्थाल यांनी हे विधेयक तयार केले आहे. लिंडसे ग्रॅहम यांचे नुकतेच अचानक निधन झाले. त्यांच्या विधेयकात या देशांवर ५०० टक्के आयात शुल्क लादण्याचे सुचवण्यात आले होते. त्या तुलनेत 'सुधारित 'विधेयक 'सौम्य' म्हणावे लागेल. त्याला सध्या ६० सदस्यांनी पाठिंबा दिल्याचे वृत्त आहे. कोणतेही विधेयक सिनेट आणि प्रतिनिधीगृह या दोन्ही सभागृहांत मंजूर व्हावे लागते. त्या आधी चर्चा होणे आवश्यक असते. उत्पादन क्षेत्रातील 'जादा क्षमता व उत्पादन यांचीही पाहणी व्यापार प्रतिनिधी करत आहेत. त्याचा निष्कर्ष व त्यामुळे भारतावर आणखी शुल्क लादले जाईल का हे अजून स्पष्ट झालेले नाही. पण तोही धोका आहेच.

करराचे काय?

अमेरिकेत विधेयक मंजूर होऊन त्याचे कायद्यात रूपांतर होण्याची प्रक्रिया वेळखाऊ आहे. त्यामुळे नवे विधेयक लगेच मंजूर होण्याची शक्यता कमी आहे. परंतु भारत व इतरही देशांना त्यामुळे समाधानी राहता येणार नाही. अमेरिकेच्या व्यापार प्रतिनिधींनी तेथील १९७४ च्या व्यापार विषयक कायद्याच्या ३०१ व्या कलमाखाली ६० देशांवर एक शुल्क लादण्याचे प्रस्तावित केले आहे. उत्पादनासाठी कामगारांकडून 'जबरदस्तीने' काम करून घेणे, या कारणासाठी १२.५ टक्के शुल्क लादण्याची तरतूद या कलमात आहे. विकसनशील देश यात बहुसंख्य असले तरी काही विकसित देशही आहेत. या शुल्काचा भार टाळण्यासाठी केंद्र सरकारला परकीय व्यापार धोरणात 'जबरदस्तीने काम करायला लावणे' हा मुद्दा समाविष्ट करावा लागला आहे. संघटित क्षेत्रात असे कामगार नसतात पण शेती, पशुपालन, बांधकाम, आदी क्षेत्रांत तसे कामगार असू शकतात. इंडोनेशिया, कंबोडिया, पेरु वगैरे विकसनशील देश आणि कॅनडासारख्या विकसित देशासही आपल्या धोरणात या अनुषंगाने सुधारणा करावी लागली आहे. या कलमात काही विसंगती असल्याचे सांगत भारताने या शुल्काचा फेरविचार करण्याची मागणी केली आहे. ट्रम्प आणि त्यांचा पक्ष यांना आपण जगावर राज्य करत आहोत असे वाटत आहे. इतर देशांनी अमेरिकेचा गैरफायदा घेतला आहे त्याची 'वसुली' करणे हे उद्दिष्ट ट्रम्प यांनी पूर्वीच जाहीर केले आहे. संबंधित देशांत कामगारांची स्थिती चांगली नसल्याचे त्यांच्या प्रशासनाने परस्पर ठरवून टाकलेले दिसते. ट्रम्प यांच्या १० टक्के शुल्काची मुदत येत्या दि. २४ रोजी संपत आहे. त्या नंतर शुल्क लादण्यासाठी नवे कारण व नवे मार्ग ट्रम्प वापरू शकतात. गेल्या वर्षी प्रत्युत्तर शुल्क लादल्यानंतर भारत व अमेरिकेतील व्यापार कराराची चर्चा थांबली होती. ती पुन्हा सुरू झाली असताना नव्या शुल्काचे शुक्लकाष्ट उद्भवले आहे. प्रत्युत्तर शुल्क येण्या आधीच अमेरिकन वस्तूंवरील कर केंद्राने कमी केले. तेथून आयातही वाढवली. तरी ट्रम्प यांचे समाधान झालेले दिसत नाही. प्रस्तावित १०० टक्के शुल्कामुळे भारताची खनिज तेलाची आयात धोक्यात येऊ शकते. रशियाकडून भारत सध्या एकूण तेल आयातीच्या ५० टक्क्यांपेक्षा जास्त तेल खरेदी करत आहे. पश्चिम आशियातील संघर्षामुळे होर्मुझच्या सामुद्रधुनीतून होणार्‍या तेल व गॅसच्या आयातीवर परिणाम झाला आहे. ऊर्जेची गरज भागवण्यासाठी अन्य विक्रेते भारत शोधत आहे. अनेक देशांशी 'मुक्त व्यापार करार'केले असले तरी ते सर्व खनिज तेल विकत नाहीत. अमेरिकेला निर्यात वाढवणे भारतास आवश्यक आहे. मात्र दोन शुल्कांचा धोका असल्याने नियोजित व्यापार करारात अडथळा आला आहे.

# डोकेदुखीचे मुख्य कारण



मेंदूमध्ये स्वतःच्या वेदना जाणवणाऱ्या नसा नसतात. त्यामुळे आपल्याला जाणवणारे 'ब्रेन पेन' हे प्रत्यक्षात डोकेदुखी असते. हे दुखणे डोक्याच्या बाहेरील त्वचेमध्ये, स्नायूंमध्ये किंवा रक्तवाहिन्यांमध्ये निर्माण होते. ही डोकेदुखी तणाव, झोप न लागणे किंवा गंभीर आजारांमुळे होऊ शकते.

डोकेदुखीचे मुख्य प्रकार

१. टेन्शन डोकेदुखी

लक्षणे: कपाळावर आणि डोक्याच्या मागच्या भागात घट्ट पट्टा बांधल्यासारखे किंवा दाबल्यासारखे वाटते.

कारण: मानसिक ताण, थकवा किंवा संगणकावर जास्त वेळ काम करणे.

२. मायग्रेन / अर्धशिशी

लक्षणे: डोक्याच्या एकाच बाजूला ठोके पडल्यासारख्या तीव्र वेदना होतात. प्रकाश आणि आवाजाचा त्रास होतो.

कारण: संप्रेषकांमधील बदल, तीव्र प्रकाश किंवा काही विशिष्ट अन्न. ३. सायनस डोकेदुखी

लक्षणे: डोळे, कपाळ आणि नाकाच्या बाजूला जडपणा व दुखणे.

कारण: सर्दी, ऍलर्जी किंवा सायनसमध्ये कफ साठणे.

४. क्लस्टर डोकेदुखी

लक्षणे: एका डोळ्याच्या भोवती अतिशय तीव्र वेदना, डोळा लाल होणे आणि नाक गळणे.

५. गंभीर किंवा दुय्यम डोकेदुखी-लक्षणे: अचानक सुरू होणारी असह्य डोकेदुखी किंवा डोक्याच्या दुखापतीमुळे होणारी वेदना. कारण: रक्तदाब, मेंदूतील गाठ किंवा संसर्ग.

## अपूर्ण झोपेमुळे आरोग्यच नाही...

तर दीर्घकाळ झोप न लागल्यामुळे प्रेमसंबंधांवर विपरीत परिणाम झाला आणि घटस्फोटासारख्या घटनाही घडल्या. अशा परिस्थिती टाळण्यासाठी, आपण किमान ७ तास झोप घेणे आणि आपल्या जोडीदाराची मदत घेणे महत्वाचे आहे. ओव्हर रिक्ट करण्यापूर्वी थांबवा

जर तुम्हाला पुरेशी झोप येत नसेल आणि तुम्हाला तुमच्या

नात्यात समस्या येऊ लागल्या असतील, तर काही गोष्टी लक्षात घेणे आवश्यक आहे. यासाठी, जेव्हा तुम्ही एखाद्या गोष्टीवर अतिप्रक्रिया करता तेव्हा प्रथम लक्षात ठेवा की तुमची झोप न लागणे हे त्याचे कारण आहे का. जर झोपेच्या कमतरतेचा तुमच्या मनःस्थितीवर नकारात्मक परिणाम होत असेल तर तुम्ही तुमच्या जोडीदाराला गोष्टी सांगा. झोपेच्या कमतरतेमुळे विचार, समज आणि वागण्यात बदल होतो.

जर तुम्ही तुमची समस्या तुमच्या जोडीदारासोबत शेअर केली आणि त्या समस्येवर एकत्रितपणे तोडगा काढण्याचा विचार केला तर नात्यातील वाढती कटुता थांबू शकते.

इतकंच नाही तर जेव्हाही तुम्हाला राग येतो तेव्हा स्वतःला थांबवणं आणि ओव्हर रिक्ट करण्यापूर्वी स्वतःला शांत करण्याचा प्रयत्न केल्याने तुमचं नातं तुटण्यापासून वाचवता येईल.

स्मरणशक्ती कमी होणे

जर आपण ५ तासांची झोप देखील पूर्ण करू शकलो नाही तर त्याचा आपल्या मेंदूवर नकारात्मक परिणाम होतो. झोपेच्या वेळी, आपला मेंदू अशा प्रकारे कार्य करतो की गोष्टी लक्षात ठेवणे सोपे होते. उलट सावली कमी केली तर आपली स्मरणशक्ती नक्कीच कमी होईल. या गोष्टीचा तुमच्या नात्यावर थेट परिणाम होतो.

मधुमेहाचा धोका

मधुमेह हा केवळ भारतातच नाही तर जगभरात एक गंभीर आजार बनला आहे. जर तुम्हाला याला बळी पडायचे नसेल तर ८ तासांची झोप नक्कीच घ्या. अन्यथा रक्तातील साखरेची पातळी वाढू लागते आणि मधुमेहाचा धोका निर्माण होतो.

मूड स्विंग-जर आपण झोपलो नाही तर आपला मेंदू पूर्णपणे थकतो, ज्यामुळे आपला मूड देखील सामान्य राहत नाही, अशा स्थितीत, नैराश्य, चिंता, तणाव आणि मूड बदलणे अपरिहार्य आहे. त्यामुळे ८ तासांची झोप घ्या. आपली झोप पूर्ण झाली नाही तर आपल्या शरीराची प्रतिकारशक्ती कमकुवत होते.

## हरिजागरणाची खरी दिशा...

निष्काळजीपणे वाया घालवला तर पुन्हा कधीही परत मिळत नाही. आजचा विद्यार्थी परीक्षा जवळ आली तरी वेळ मोबाईलवर घालवतो. व्यापारी आरोग्याकडे दुर्लक्ष करून संपत्तीच्या मागे धावतो. कर्मचारी कुटुंबासाठी वेळ काढत नाही. पालक मुलांशी संवाद साधण्याऐवजी इतर व्यस्ततेत अडकतात. नंतर पश्चात्ताप होतो; पण गेलेली वेळ परत येत नाही. संत तुकाराम महाराजांचे हे वचन या प्रत्येक उदाहरणाला लागू पडते.

ज्यांची तुज गुंती । तें तो मोकलिती अंती ही ओळ मानवी नात्यांच्या वास्तवावर प्रकाश टाकते. गुंती म्हणजे आसक्ती, मोह आणि अतिरेकी भावनिक बांधिलकी. संत तुकाराम महाराज नात्यांचा विरोध करत नाहीत. त्यांनी संसार सोडून पलायन करण्याचा संदेश दिलेला नाही. ते एवढेच सांगतात की संसारात राहा; पण संसार तुमच्या मनात राहू देऊ नका. जी व्यक्ती आपली आहे असे आपण समजतो;ती शेवटच्या क्षणी आपल्याबरोबर येत नाही. मृत्यूच्या वेळी संपत्ती, प्रतिष्ठा, पद, मान-सन्मान, नातेवाईक; सर्व काही मागे राहते. प्रत्येकाला एकट्यालाच पुढे जावे लागते. म्हणूनच संतांनी गुंती हा शब्द वापरला आहे. नाते असावीत,पण त्यामध्ये विवेकही असावा. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिले तर आज कुटुंबव्यवस्था बदलत आहे. आर्थिक गरजा वाढल्या आहेत; परंतु भावनिक जवळीक कमी होत आहे. नाती व्यवहारावर उभी राहू लागली आहेत. वारसा, मालमत्ता, अहंकार आणि अपेक्षा यांमुळे नात्यांमध्ये तणाव निर्माण होत आहे. अशा वेळी तुकाराम महाराज सांगतात की नात्यांवर प्रेम करा; पण त्यांच्यात स्वतःला हरवू नका. कारण प्रत्येकाचे अंतिम सत्य स्वतंत्र आहे.

तुका म्हणे बरा । लाभ काय तो विचारा ही शेवटची ओळ संपूर्ण अभंगाचा सार आहे. संत तुकाराम महाराज प्रत्येक माणसाला आत्मपरीक्षण करण्याचे आवाहन करतात. मी जे करतो आहे त्याचा खरा लाभ काय? हा प्रश्न प्रत्येकाने स्वतःला विचारला पाहिजे. आज माणूस यशस्वी होण्यासाठी धडपडतो; परंतु त्या यशातून त्याला अंतःशांती मिळते का? संपत्ती वाढते, पण समाधान वाढते का? प्रसिद्धी मिळते,पण आत्मविश्वास वाढतो का? ज्ञान वाढते, पण विवेक वाढतो का? हीच खरी विचार करण्याची वेळ आहे. तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने लाभ म्हणजे आत्मसाक्षात्कार होय. सामाजिक दृष्टिकोनातून लाभ म्हणजे समाजासाठी केलेले विधायक कार्य होय. आध्यात्मिक दृष्टिकोनातून लाभ म्हणजे ईश्वराशी दृढ नाते निर्माण होणे. संत तुकाराम महाराजांचा लाभ हा भौतिक नसून शाश्वत आहे.

भारतीय संतपरंपरेत शाश्वत लाभ या संकल्पनेला विशेष महत्त्व आहे. संत ज्ञानेश्वरांनी आत्मज्ञानाचा लाभ सांगितला, संत नामदेवांनी नामस्मरणाचा लाभ सांगितला, संत एकनाथांनी समतेचा लाभ सांगितला, तर संत तुकाराम महाराजांनी विवेकपूर्ण भक्तीचा लाभ सांगितला. हा लाभ कोणत्याही बाजारात मिळत नाही; तो अंतर्मनातील जागृतीतून प्राप्त होतो. या अभंगामध्ये संत तुकाराम महाराजांनी जीवनाचे एक अत्यंत व्यावहारिक सूत्र दिले आहे. जागे व्हा, वेळेचे महत्त्व ओळखा, मोहाच्या गुंत्यात अडकू नका आणि प्रत्येक कृतीचा अंतिम लाभ तपासा. ही चार सूत्रे स्वीकारली तर जीवन अधिक अर्थपूर्ण होऊ शकते. आज कृत्रिम बुद्धिमत्ता, तंत्रज्ञान,वेगवान जीवनशैली आणि प्रचंड माहितीच्या युगात माणूस बाहेरून अधिक जागृत दिसतो; परंतु आतून अधिक अस्वस्थ आहे. माहिती वाढली आहे; पण आत्मज्ञान कमी झाले आहे. संपर्क वाढला आहे; पण संवाद कमी झाला आहे. साधने वाढली आहेत; पण साधना कमी झाली आहे. अशा वेळी संत तुकाराम महाराजांचा हरिच्या जागरणा हा संदेश अधिकच समकालीन ठरतो. हरिजागरण म्हणजे केवळ टाळ-मृदंगाच्या तालावर रात्रभर जागरण करणे नाही. हरिजागरण म्हणजे आपल्या अंतःकरणात विवेकाचा दिवा प्रज्वलित करणे. हरिजागरण म्हणजे स्वतःच्या दोषांना ओळखणे. हरिजागरण म्हणजे प्रत्येक क्षणाला ईश्वराच्या स्मरणाने अर्थपूर्ण बनवणे. हरिजागरण म्हणजे समाजासाठी उपयुक्त जीवन जगणे. हरिजागरण म्हणजे प्रेम, करुणा, सत्य, प्रामाणिकपणा आणि सेवाभाव यांच्या प्रकाशात जीवन जगणे.संत तुकाराम महाराजांचा हा अभंग प्रत्येकाला एकच प्रश्न विचारतो; तू आयुष्यभर जागाच होतास की खर्‍या अर्थाने कधी जागा झालास? या प्रश्नाचे उत्तर प्रत्येकाने स्वत:च्या अंतःकरणात शोधायचे आहे. हा अभंग प्रत्येकाला स्वतःच्या जीवनाचा लेखाजोखा मांडण्यास भाग पाडतो. आपण जागृत आहोत की केवळ जगत आहोत? आपण वेळेचा उपयोग करतो आहोत की तो वाया घालवत आहोत? आपण नात्यांमध्ये प्रेमाने जोडलेलो आहोत की मोहाच्या गुंत्यात अडकलो आहोत? आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे आपल्या आयुष्याचा खरा लाभ काय आहे? संत तुकाराम महाराजांचे हे अमृतवचन आजही तितकेच समकालीन, तितकेच प्रभावी आणि तितकेच मार्गदर्शक आहे. जो मनुष्य या अभंगाचा अर्थ केवळ शब्दांमध्ये न शोधता आपल्या आचरणात उतरवतो, त्याच्यासाठी प्रत्येक दिवस हरिजागरणाचा उत्सव बनतो आणि प्रत्येक श्वास ईश्वरस्मरणाने पावन होतो. अशीच अंतर्मनाची जागृती म्हणजे खर्‍या अर्थाने संत तुकाराम महाराजांनी सांगितलेली जीवनसाधना होय.

## १ Doctor Tips — सल्ला डॉक्टरचा



स्पिनिंग-फायदे-० शरीरातील अतिरिक्त चरबीचं प्रमाण घटतं. तग धरण्याची क्षमता वाढते. एरोबिक्स-नृत्यातून व्यायाम व्हावा यासाठी एरोबिक्सची निर्मिती करण्यात आली. एरोबिक्समध्ये केल्या जाणाऱ्या विविध शारीरिक हालचालींमुळे व्यायाम करणाऱ्यांमध्ये उत्साह निर्माण होतो आणि नृत्यामधून होणाऱ्या व्यायामामुळे मानसिक आनंदही प्राप्त होतो.


## २ Joke — विनोद




राधा : काय गं राणी, तुझ्या नवऱ्याला तुरुंगात का जावे लागले?

राणी : काय नाही गं, यांनी नोटा छापायची सरकारशी स्पर्धा केली म्हणून.

## ३ Message — संदेश



Tourist = Ye kiska kankaal hai..? Santa = Ye tipu-sultaan ka kankaal hai.. Tourist = Or ye bagal wala chhota sa kankaal kiska hai..? Santa = Ye bhi tipu-sultaan ka kankaal hai.. jab wo chhota bachcha tha….

## ४ Thought — सुविचार



शब्दांपेक्षा मौनच जास्त बोलके असते.


– कार्लाइल

**संस्कृत सुभाषित**

आयु: सत्त्वबलारोग्यसुखप्रीतिविवर्धना:।
रस्या: ास्निग्धा: ास्थिरा हृद्या आहारा: सात्विकप्रिया : ।।

अर्थ – जो आहार आयुष्य, मनोबल, शक्ती, प्रेम, सुख यांचे संवर्धन करतो, तोच आहार सात्विक लोकांना प्रिय असतो.(हा स्निग्ध आणि रसमय आहार असतो.)

# महाशब्दकोड्यांचा समाचार



### आडवे शब्द

१. खर्चात कपात
६. पुष्कट
९. पोटापुरता शिधा
११. प्रमाणपत्र
१२. विश्रांती
१४. गणगोत
१६. तात्काळ
१८. आपला देश
१९. मोठी चूल
२०. चोरी करणारा
२२. झाडलोट
२४. वाढलेला व्याप
२५. जरतारीचा मोर यावर नाचतो
२७. प्रयत्न
२८. घाव, प्रहार
२९. रोखलेली नजर
३१. संतोष, आनंद
३४. समुद्रकिनारा
३८. पुरुष
३९. शिव! शिव!
४०. नुसतीच भटकंती
४१. विशेष
४२. अत्यंत यातनामय अवस्था
४५. माळ, सर
४६. हात
४८. पर्जन्य
४९. फोडातील द्रव
५०. गप्पांची जागा
५२. वक्र
५३. पूर्ण भेदून जाणारे
५४. शरीर
५५. अरण्य, जंगल
५६. तीव्र, अत्यंत टोकदार
५७. दिवस
५९. अर्धांगवायू
६१. चर्चा
६३. कावळा
६४. थोडेसुद्धा, अल्पप्रमाण
६५. टोळीचा प्रमुख
६७. खिडकी
६९. मच्छर
७१. तातडीचे संदेशवहन करण्याचा नामशेष झालेला प्रकार
७३. हनुमान (ग्रा.)
७५. प्रेम, ममता
७७. हमाल
८१. सूर्याचे एक नाव
८२. ठोक, हाण!
८३. युक्ती
८४. नेता, पुढारी

### उभे शब्द

१. कपडालत्ता
२. टिंगल, टवाळी
३. केव्हा (ग्रा.)
४. शाश्वत, चिरंतन
५. सोन्या-चांदीचा व्यापारी
७. महाशिवरात्रीचा मराठी महिना
८. परस्पर
९. पुन्हा पुन्हा
१०. प्रगती, उन्नत
१२. विमान
१३. कच्चे राहिल्यास निरूपयोगी मृत्तिकापात्र
१५. निवासस्थान
१७. आत-बाहेर करण्याची चौकट
२१. दात
२३. वंशपरंपरागत अधिकार
२६. फळातील द्रव
२७. सामान्य
३०. तापापूर्वीचे शहारे
३२. माणूसकी
३३. धैर्य, हिंमतीचे काम
३५. मगज
३६. कडक, न दबणारे
३७. साहित्यातील नऊ भावना
४१. मीठाची चव
४२. नाकी दम आणणारा आकडा
४३. भरपूर रस असलेला
४४. वेडावाकडा
४५. परिस्थिती
४६. पळसाचा डिंक
४७. जन्म-मृत्यू
४८. मोदकाचे आच्छादान
५०. पत्र
५१. अभिप्राय
५३. नाविकदल
५५. मध्यरात्रीचा पाऊस
५८. विरोध, द्वेष
६०. आठवाड्याचा दिवस
६२. चिकटून, जवळ
६६. अति तीव्र, जाळणारे
६८. माफी, दया
७०. दाताखालचा, मदतनीस
७२. महान
७४. कैकयीची दासी
७६. वेदना
७७. वजन
७८. सुंदर तरुणी, पत्नी
७९. शंकर
८०. शेवट

### आडवे उत्तरे

१.काटकसर ६.अमाप ९.पसाभार ११.परवाना १२.आराम १४.घरदार १६.तडकाफडकी १८.भारत १९.भट्टी २०.चोर २२.कोवारे २४.पसारा २५.पदर २७.सायास २८.वार २९.टक ३१.समाधान ३४.सागरतट ३८.नर ३९.हरहर ४०.वणवण ४१.खास ४२.नरकवास ४५.हार ४६.कर ४८.पाऊस ४९.लस ५०.टमटमनगरी ५२.वाकडा ५३.आरपार ५४.तन ५५.रान ५६.तीक्ष्ण ५७.वासर ५९.लकवा ६१.मसलत ६३.काक ६४.लवमात्र ६५.सरदार ६७.गवाक्ष ६९.डास ७१.तार ७३.हणमंत ७५.माया ७७.भारवाहक ८१.प्रभाकर ८२.मार ८३.करामत ८४.नायक

### उभे उत्तरे

१.कापडचोपड २.टर ३.कवा ४.सनातन ५.सराफ ७.माघ ८.परभारे ९.परतपरत १०.भरभराट १२.आकाशयान १३.मडके १५.दार १७.कीरवा २१.रद २३.वारसाहक्क २६.रस २७.साधारण ३०.कसकस ३२.मानवता ३३.साहस ३५.गर ३६.टणक ३७.नवरस ४१.खारट ४२.नऊ ४३.रस-वान ४४.वाकडातिकडा ४५.हालह-वाल ४६.कमरकस ४७.जननमरण ४८.पारी ५०.टपाल ५१.मत ५३.आरमार ५५.रातवा ५८.सवतासुभा ६०.वार ६२.लगत ६६.दाहक ६८.क्षमा ७०.सहाय्यक ७२.थोर ७४.मंथरा ७६.यातना ७७.भार ७८.वामा ७९.हर ८०.अंत



# क्रीडा विश्व



## थोडक्यात/ संक्षिप्त

### निवृत्तीच्या गप्पा करणाऱ्यांना रोहित शर्माचे जोरदार प्रत्युत्तर

**लंडन**–लॉर्ड्सवर झालेल्या तिसऱ्या वनडे सामन्यात रोहित शर्मानं शानदार फलंदाजी केली. त्यानं एका शानदार शतकानं आपल्या टीकाकारांची तोंडं बंद केली. लॉर्ड्सवरील वनडे सामन्यापूर्वी, हा सामना रोहितचा शेवटचा असू शकतो, अशा बातम्या माध्यमांमध्ये आल्या होत्या. यावर आता खुद्द महिटमॅनफ्नं या अफवांवर एक महत्त्वपूर्ण विधान केलं आहे. तो म्हणाला, मफ्जोपर्यंत मी खेळत राहीन, तोपर्यंत हे सुरुच राहील. सध्या माझं लक्ष चांगलं क्रिकेट खेळण्यावर आहे.फ्फ

निवृत्तीच्या अफवांवर रोहित शर्माचं विधान : लॉर्ड्सवर शतक झळकावल्यानंतर रोहित म्हणाला, मफ्मैदानावर फलंदाजीत धावा करणं हे माझं काम आहे. माझ्या देशाचं आणि संघाचं प्रतिनिधित्व करणं हे माझं काम आहे. जेव्हापासून मी माझ्या कारकिर्दीला सुरुवात केली आहे, तेव्हापासून मला हेच करण्यास सांगितलं गेलं आहे आणि मी ते करत राहीन. माझ्या पदार्पणापासून माझ्या निवृत्तीबद्दल आणि फॉर्मबद्दल अफवा पसरल्या आहेत , या अफवांचा माझ्यावर फारसा परिणाम होत नाही. रोहित पुढं म्हणाला की, माझ्यासाठी सर्वात महत्त्वाचं म्हणजे मी मैदानावर काय करतो आणि संघाच्या विजयासाठी मी किती योगदान देऊ शकतो.

### २०२७ चा वर्ल्डकप टीम इंडिया जिंकणार? स्पेनच्या विजयानंतर जुळून आलाय खास योगायोग

**दिल्ली**–स्पेनचा संघ फुटबॉल विश्वातील जगजेत्ता संघ ठरला. गतविजेत्या अर्जेंटिनाचा १–० असा थरारक पराभव करत दणक्यात विजय मिळवला. अमेरिकेतील न्यूयॉर्क–न्यू जर्सी स्टेडियम, ईस्ट रदरफोर्ड येथे झालेल्या या अंतिम सामन्यात स्पेनने इतिहासातील दुसऱ्यांदा फिफा विश्वचषकावर नाव कोरलं. आता स्पेनच्या या विजयाने भारताच्या आगामी वनडे वर्ल्डकप विजयाचा मार्ग सुकर झाल्याच्या चर्चा सुरू आहेत, अगदी वेगळाच योगायोग पाहायला मिळत आहे.

फेरान टोरेस स्पेनच्या विजयाचा शिल्पकार ठरला. त्याने एक्स्ट्रा टाईम केलेला एकमेव गोल सामन्याचा निर्णायक क्षण ठरला. या गोलच्या जोरावर स्पेनने अर्जेंटिनाचं विश्वविजेतेपद हिरावून घेत पुन्हा एकदा फुटबॉल विश्वावर आपलं वर्चस्व सिद्ध केलं. तर फुटबॉल खेळाचा दिग्गज लिओनेल मेस्सीला मात्र रित्या हाती परतावं लागलं. पण स्पेनच्या पराभवामुळे मात्र एक अनोखं समीकरण सध्या समोर आलं आहे. क्रीडा विश्वात अनेकदा असे काही योगायोग घडून येतात, जे चाहत्यांना थक्क करतात. सध्या सोशल मीडियावर अशाच एका रंजक समीकरणाची जोरदार चर्चा रंगली आहे. स्पेनने जेव्हा पहिल्यांदा फिफा विश्वचषक २०१० मध्ये जिंकला होता.

### ओल्या डोळ्यांनी बोलायला सुरुवात केली, कंठ दाटून आला

दिल्ली–न्यू जर्सी येथील मेटलाइफ स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या या ऐतिहासिक मॅचमध्ये युरोपियन चॅम्पियन स्पेन आणि डिफेंडिंग चॅम्पियन अर्जेंटिना हे दोन दिग्गज संघ आमनेसामने आले होते. या मॅचमध्ये स्पेनने सुरुवातीपासूनच अत्यंत शिस्तबद्ध खेळ दाखवून फुटबॉल चाहत्यांना खिळवून ठेवलं अन् अखेर अर्जेंटिनावर विजय मिळवला आहे. अर्जेंटिनाची यंदाच्या वर्ल्ड कपमधील सर्वात खराब कामगिरी राहिली. त्यानंतर आता अर्जेंटिनाचे कोच लिओनेल स्कालोनी यांना पत्रकार परिषदेत भावना अनावर झाल्या. त्यांनी प्रेस कॉन्फरेन्स अर्धवट सोडली.अश्रू रोखू शकले नाहीत...

अर्जेंटिनाच्या भविष्यातील वाटचालीबद्दल बोलताना लिओनेल स्कालोनी यांनी आपल्या कराराचा सन्मान करण्याचं स्पष्ट केलं. संपूर्ण पत्रकार परिषदेत भावनांवर नियंत्रण ठेवणारे प्रशिक्षक लिओनेल स्कालोनी शेवटी स्वत:चं अश्रू रोखू शकले नाहीत आणि डोळ्यात पाणी येताच त्यांनी प्रेस कॉन्फरेन्स अर्धवट सोडली. या पराभवानंतर पुन्हा एकदा नव्या जोमाने उभे राहण्याचा निर्धार अर्जेंटिनाच्या गोटातून व्यक्त करण्यात आला आहे.मी माझ्या संघाच्या आठवणी, त्यांनी मिळवलेले यश आणि इथंपर्यंत पोहोचण्याचं महत्त्व कायम जपून ठेवीन. आपल्याला याला प्रचंड महत्त्व द्यावं लागेल.

### विश्वचषक जिंकल्यानंतर, यमाल आणि प्रेयसी मैदानावरच झाले रोमँटिक!

दिल्ली–फुटबॉल विश्वचषक २०२६ चा फायनलचा सामना काही तासांपूर्वी झाला आणि यामध्ये स्पेनच्या संघाने बाजी मारली. अर्जेंटिना विरुद्ध स्पेन यांच्यामध्ये सामना पार पडला या सामन्यात स्पेनने १–० असा विजय मिळवला. २०१० नंतर स्पेनने आपले हे पहिले विजेतेपद नावावर केले होते. या सामन्यानंतर चाहत्यांनी तर जल्लोष साजरा केलाच त्याचबरोबर खेळाडूंनी देखील मैदानामध्ये त्यांचा आनंद साजरा केला. फायनलचा सामना होता त्यामुळे अनेक खेळाडूंच्या कुटुबातील सदस्य देखील सामना पाहायला आले होते. आता सध्या स्पेनचा स्टार खेळाडू, लामिन यामाल आणि त्याच्या गर्लफ्रेंडचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आणि तो चर्चेचा विषय बनला.

स्पेनच्या संघाने सामना जिंकल्यानंतर संपूर्ण स्टेडियम आणि खेळाडू हे विजयाचा उत्सव साजरा करत होते. यावेळी लामिन यामाल आणि त्यांच्या गर्लफ्रेंडचा व्हिडिओ वेगाने व्हायरल होत आहे. यामाल आणि त्याची गर्लफ्रेंड इनेस गार्सिया सँटोस हे दोघे, मैदानाच्या एका भागात एकमेकांच्या प्रेमात पडले. व्हिडिओमध्ये दिसत आहे की, यामालच्या प्रेयसीने त्याला मिठी मारली.

# फुटबॉलमधील स्पॅनिश शैली पुन्हा जगज्जेती!

**स्पेनने विशिष्ट फुटबॉल शैली विकसित केली, जी सातत्याने अजिंक्य ठरू लागली आहे. अनेक प्रस्थापित संघांना हे जमू शकलेले नाही. अर्जेंटिनाचा १–० असा पराभव करून दुसऱ्यांदा विश्वचषक पटकावल्यानंतर विजेतेपदाचा आनंद साजरा करताना स्पेनचे फुटबॉलपटू.**



मुंबई : फुटबॉल विश्वचषक २०२६ स्पर्धेच्या अंतिम लढतीत स्पेनने गतविजेत्या अर्जेंटिनाचा १–० असा पराभव करून दुसर्यांदा जगज्जतेपद पटकावले. गेल्या १८ वर्षांमध्ये या संघाने तीन युरो आणि दोन जगज्जेतेपदांची कमाई केली. या जोडीला नव्याने सुरू झालेल्या नेशन्स लीग स्पर्धेचे अजिंक्यपदही त्यांनी पटकावले. विशिष्ट एका खेळाडूवर अवलंबून न राहता, संपूर्ण सांघिक, सूत्रबद्ध पद्धतीचे फुटबॉल खेळून स्पेनने जगभरातील फुटबॉलप्रेमींची मने जिंकली.

आजवर ब्राझील (५), इटली (४), जर्मनी (४), अर्जेंटिना (३), फ्रान्स (२), स्पेन (२), इंग्लंड (१) अशा आठच देशांना विश्वचषक जिंकता आला. परंतु या महारथी संघांमध्ये स्पेनची कामगिरी नवीन शतकात सर्वाधिक उजवी झाली असेच म्हणावे लागेल. जगज्जेत्यांच्या 'क्लब'मध्ये स्पेन सर्वांत उशिराने म्हणजे २०१० मध्ये दाखल झाला. नवीन शतकात ब्राझील (२००२), इटली (२००६), जर्मनी (२०१४), फ्रान्स (२०१८) आणि अर्जेंटिना (२०२२) या प्रस्थापित सत्तांनी एकेकदा जगज्जेतेपद पटकावले. स्पेनने यांच्या तुलनेत २०१० आणि २०२६ अशा दोन विश्वचषकांवर नाव कोरले. या जोडीला २००८, २०१२ आणि २०२४ युरो अजिंक्यपदांचा विचार केल्यास स्पेनची कामगिरी अधिकच झळाळते. युरो आणि पाठोपाठ विश्वचषक जिंकण्याची किमया स्पेनने दोनदा (२००८, २०१०; २०२४, २०२६) साधली.

फिफा फायनलनंतर डोनाल्ड ट्रम्प यांच्याही वाट्याला शरद पवारांसारखाच कटू अनुभव जर्मनीने प्रथम (१९७२, १९७४) अशी कामगिरी केली होती. तर विश्वचषकानंतर युरो जिंकण्याची करामतही (२०१०, २०१२) स्पेनच्या नावावर आहे. त्यांच्याव्यतिरिक्त केवळ फ्रान्सलाच (१९९८, २०००) हे जमले. पण या आकड्यांपेक्षाही महत्त्वाची बाब म्हणजे, स्पेनने विशिष्ट फुटबॉल शैली विकसित केली, जी सातत्याने अजिंक्य ठरू लागली आहे. विद्यमान प्रस्थापित देश किंवा इतरही मोठ्या संघांना हे जमू शकलेले नाही. त्यामुळेच स्पेनचा संघ अधिक सातत्य दाखवत आहे. चेंडूवरील ताबा न सोडणे, छोटे पासेस देत राहणे (ज्यास टिकी–टाका शैली असेही म्हटले जाते), प्रतिस्पर्ध्याकडे चेंडू असल्यास तो परत मिळवण्यासाठी पुरेपूर प्रयत्न करणे ही काही वैशिष्ट्ये सांगता येतील. ही सगळी करामत मैदानावर सामूहिक शिस्तबद्धतेने सादर करणे ही स्पेनची खरी ताकद आहे.

## रोहितने मला निवृत्तीबद्दल सांगितलेच नाही..., शुभमन उद्धटपणे बोलला

दिल्ली–इंग्लंडविरुद्धच्या तीन सामन्यांच्या वनडे मालिकेत टीम इंडियाला २–१ ने पराभवाचा सामना करावा लागला. स्टार ओपनर रोहित शर्माची १३८ धावांची खेळी व्यर्थ गेली. गेल्या काही दिवसांपासून चालू असलेल्या निवृत्तीच्या चर्चांना हिटमॅनने आपल्या बॅटने उत्तर दिलंय. त्यानंतर आता टीकाकारांची तोंड बंद होत असताना आता शुभमन गिललाच रोहित शर्मा नको झालाय का? असा सवाल विचारला जात आहे. मॅचनंतरच्या प्रेस कॉन्फरेन्समध्ये शुभमन गिलने रोहितच्या निवृत्तीवर असं काही म्हणाला की, सगळ्यांच्या भूवया उंचावल्या आहेत.

११ किलो वजन कमी केलं पण शुभमन सरड्यासारखा पलटला!

एखादा खेळाडू जेव्हा आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळत असतो तेव्हा त्याच्या मनात क्लियारिटी असणं गरजेचं असतं. रोहित आगामी वनडे वर्ल्ड कपची तयारी करत असताना त्याच्या निवृत्तीवर चर्चा सुरू झाल्या. त्याने वर्ल्ड कपसाठी ११ किलो वजन कमी केलं. त्यानंतर त्याने इंग्लंडविरुद्ध लॉर्ड्सच्या मैदानावर शतक ठोकून देखील कॅप्टन शुभमन गिल याने रोहित शर्माला बॅक केलं असून प्रेस कॉन्फरेन्समध्ये उद्धटपणे बोलला आहे. त्यामुळे गंभीर नाही तर कॅप्टनलाच रोहितला संघात स्थान द्यायचं नाहीये का? असा प्रश्न विचारला जातोय.

काय म्हणाला शुभमन गिल?

रोहित शर्माच्या निवृत्तीच्या चर्चा होत आहेत. इंग्लंड दौऱ्यानंतर तो निवृत्ती घेईन अशी चर्चा, त्यावर टीमची भूमिका काय आहे? असा प्रश्न गिलला प्रेस कॉन्फरेन्समध्ये विचारला गेला. त्यावर गिलने शॉकिंग उत्तर दिलं. 'रोहित शर्माने याबद्दल आम्हाला काही सांगितलं नाही. या चर्चा बाहेर होत असतील पण टीममध्ये अशी कोणतीही चर्चा नाही.', असं शुभमन गिल म्हणाला आहे. शुभमन उत्तर ऐकून अनेकांनी उद्धटपणे उत्तर दिल्याचं म्हटलं आहे. कॅप्टनने खेळाडूच्या बाजूने उभा राहण्याची गरज असते अन् शुभमन यावेळी रोहितच्या पारड्यात बॉल टाकून मोकळा झाला. याचाच अर्थ टीम रोहितला बॅक करणार नाही. त्याला सोडायचं असेल तर त्याने सांगावं, असं शुभमनला म्हणायंच होतं का?

रोहितची गरज संपली का?

दरम्यान, रोहित शर्मा त्याच्या बाजूने आगामी वनडे वर्ल्ड कप खेळण्याबाबत क्लियर असताना निवृत्तीच्या चर्चांना वारं मिळतंय. अशातच टीम मॅनेजमेंट आणि कॅप्टनची जबाबदारी असते की, रोहित शर्माला क्लियारिटी मिळाली अन् खेळणार असेल तर त्याला सपोर्ट करावा. पण शुभमन गिलने मला माहिती नाही, म्हणत हात झटकल्याने क्रिडाप्रेमींचा संताप अधिकच वाढला आहे. इंग्लंडविरुद्धची मालिका संपल्याने आता रोहितची गरज संपली का? असा कडवट सवाल फॅन्स शुभमन गिलला विचारत आहेत.

रोहित अन् शुभमनचे वाजले?

रोहित शर्मा आणि शुभमन गिल यांच्यात काहीतरी वाजलेय एवढे नक्की. दोन्ही खेळाडू मैदानात सलामीसाठी असतात तेव्हा देखील दोघांमध्ये फार कमी कम्युनिकेशन होते. शुभमनला कॅप्टन म्हणून मान हवा आहे. तर रोहित अन् विराटमुळे त्याला प्रतिष्ठा मिळत नसल्याचे चित्र आहे. हाय कमिशनच्या भेटीवेळी देखील शुभमन गिलला बाजूला केले गेले होते. तर शुभमन गिलने मागील काही मॅचमध्ये रोहित शर्माला रनआऊट केलेय, अशी टीका सोशल मीडियावर होत असते.

## स्पेनचा ऐतिहासिक विजय आणि एका नव्या युगाचा उदय!

नवी दिल्ली–फुटबॉल इतिहासातील आजवरचा सर्वात मोठा महासंग्राम मानला गेलेला फिफा विश्वचषक २०२६ अत्यंत रोमांचक वातावरणात संपला आहे. तब्बल ४८ देश, १०४ सामने आणि ३०८ गोलांच्या या महामुकाबल्यात जागतिक फुटबॉलला नवा राजा मिळाला आहे  स्पेन! गतविजेत्या अर्जेंटिनाचा अटीतटीच्या अतिरिक्त वेळेत पराभव करत स्पेनने दुसऱ्यांदा विश्वविजेतेपदावर आपले नाव कोरले आहे. हा विश्वचषक केवळ स्पेनच्या विजयासाठीच नव्हे, तर मेस्सी–रोनाल्डोच्या सुवर्णयुगाचा भावुक अंत आणि काही छोट्या देशांनी रचलेल्या अद्भूत इतिहासासाठी कायम लक्षात राहील. फायनलचा थरार आणि स्पेनची बाजी–स्पेन विरुद्ध अर्जेंटिना यांच्यातील हा अंतिम सामना अत्यंत चुरशीचा ठरला. सामन्यावर स्पेनचे पूर्ण वर्चस्व होते, ज्यांनी ६८म बॉल पझेशन आणि तब्बल २० शॉट्स लगावले. मात्र, अर्जेंटिनाचा गोलरक्षक एमिलियानो मार्टिनेझ भिंतीसारखा उभा राहिला आणि त्याने ११ अशक्य सेव्ह करत स्पेनच्या मार्गात मोठा अडथळा निर्माण केला. निर्धारित ९० मिनिटांपर्यंत दोन्ही संघ गोलशून्य बरोबरीत होते. परंतु, ९३ व्या मिनिटाला अर्जेंटिनाच्या एन्झो फर्नांडिसला रेड कार्ड मिळाल्याने अर्जेंटिनाला १० खेळाडूंसह मैदान गापावे लागले. या संधीचा फायदा घेत १०६ व्या मिनिटाला निको विल्यम्सच्या जादुई पासवर फेरान टोरेसने दणदणीत गोल करत स्पेनला १–० ने ऐतिहासिक विजय मिळवून दिला. रेकॉर्ड्स आणि प्रतिष्ठित पुरस्कार–या स्पर्धेत वैयक्तिक पातळीवर अनेक मोठे विक्रम मोडले गेले.



## आम्ही दोघांनी संपूर्ण करिअर...रोहित–विराटच्या खास नात्यावर काय म्हणाला हिटमॅन?

भारत विरुद्ध इंग्लंड यांच्यामध्ये सामना पार पडला या सामन्यात रोहित शर्माने ऐतिहासिक शतक झळकावले तर विराट कोहलीने ७४ धावा केल्या. रोहित शर्मा आणि विराट कोहली या जोडीने लॉर्ड्सवर ४०० वा सामना खेळला अशी कामगिरी करणारी ही पहिली जोडी आहे. मागील काही दिवसांपासून रोहित शर्माचा लॉर्ड्स मैदानावर शेवटचा सामना असणार अशा चर्चा सुरु होत्या आणि आता त्यानंतर रोहितने लॉर्ड्सवर शतक ठोकल्यानंतर आता अफवा पसरवणाऱ्यांची तोंड बंद केली आहे.

लॉर्ड्वर शतक ठोकल्यानंतर रोहितने त्याच्या खेळीबद्दल तर सांगितलेच त्याचबरोबर त्याने विराट कोहलीसोबत त्याचे नाते कसे आहे यासंदर्भात त्याने सांगितले. रोहित शर्मा विराट कोहलीबद्दल बोलताना म्हणाला की, आम्ही दोघांनी संपूर्ण करिअर एकत्र खेळलो आहोत, आम्ही दोघांनी संघासाठी अनेक पार्टनरशिप केल्या आहेत. नेहमीच त्याला संघात पाहून मला मजा येते, दोघांना फलंदाजी करायला मजा येते. आम्ही दोघे एकमेकांना खुप चांगल्या प्रकारे समजतो, एकमेकांना नेहमीच आइडिया शेअर करत असतो. जेव्हा आम्ही फलंदाजी करत असतो तेव्हा नेहमीच आम्ही बरीच संभाषण करत असतो. त्याच्या या नात्याबद्दल बोलताना रोहित आनंदीत दिसत होता. चाहत्यांना या दोघांना एकत्र पाहायला प्रचंड आवडते. या सामन्यानंतर, रोहित शर्माने बीसीसीआयला दिलेल्या एका मुलाखतीत आपल्या निवृत्तीच्या अफवांवर उघडपणे भाष्य केले आणि आपल्या टीकाकारांना एक कडक संदेश दिला. रोहित शर्माने स्पष्टपणे सांगितले, ''माझे काम बॅटने चांगली कामगिरी करणे, मैदानावर उतरणे आणि माझ्या देशाचे प्रतिनिधित्व करणे हे आहे. माझ्या पदार्पणापासूनच बाहेरून टीका–टिप्पणी होत आली आहे आणि जोपर्यंत मी खेळत राहीन, तोपर्यंत ती सुरूच राहील. मला त्याची पर्वा नाही. माझ्यासाठी महत्त्वाचे आहे की मी मैदानावर काय करतो. जर बाहेरून टीका–टिप्पणी नसेल, तर त्यात मजा येणार नाही. माझे काम मैदानावर आहे आणि त्यांचे काम मैदानाबाहेर आहे.''रोहित शर्मानेही एका मुलाखतीत निवृत्तीच्या अफवांवर सूचकपणे भाष्य केले. तो म्हणाला, ''गोंधळ होऊ द्या. जर गोंधळच नसेल, तर त्यात मजा काय? माझं काम

# पराभवानंतर अर्जेंटिनाचे मुख्य प्रशिक्षक भावुक! परिषदेत दाटला कंठ

न्यू जर्सी–फिफा विश्वचषकातील सर्वात चर्चित सामन्यांपैकी एक ठरलेल्या स्पेनविरुद्धच्या पराभवानंतर अर्जेंटिनाच्या गोटात निराशेचे वातावरण पसरले आहे. न्यू जर्सीतील मेटलाइफ स्टेडियमवर झालेल्या या लढतीत युरोपियन चॅम्पियन स्पेनने गतविजेत्या अर्जेंटिनाचा पराभव करत स्पर्धेत मोठा धक्का दिला. या पराभवानंतर अर्जेंटिनाचे मुख्य प्रशिक्षक लिओनेल स्कालोनी पत्रकार परिषदेत भावुक झाले आणि अश्रू अनावर झाल्याने त्यांनी प्रेस कॉन्फरन्स अर्धवट सोडली.

सामन्यानंतर पत्रकार परिषदेत बोलताना स्कालोनी यांनी आपल्या भवितव्याबाबतही भाष्य केले. त्यांनी सांगितले की, आपण आपल्या कराराचा पूर्ण आदर करणार आहोत. मात्र, पुढे काय करायचे याचा गांभीर्याने विचार करण्याची गरज असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. ''मला काय करायचे आहे, याची कल्पना आहे. मी माझ्या कराराचा आदर करेन. त्यानंतर पुढील निर्णय घेईन. एवढे मोठे यश पुन्हा मिळवणे शक्य होईल का, याचाही विचार करावा लागेल,'' असे स्कालोनी म्हणाले.

भावनांवर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न करताना स्कालोनी यांनी आपल्या खेळाडूंचे कौतुक केले.



त्यांनी (थ्दहात एम्रत्दहग) सांगितले की, या संघाने देशासाठी अनेक ऐतिहासिक क्षण दिले आहेत आणि एका पराभवामुळे त्यांचे योगदान विसरता कामा नये. ''मी माझ्या संघाच्या आठवणी, त्यांनी मिळवलेले यश आणि इथपर्यंत पोहोचण्यासाठी घेतलेली मेहनत कायम जपून ठेवेन. विजयात आपण नम्र असतो, तसेच पराभवातही नम्र राहिले पाहिजे. आम्ही सामना हरलो, हे आम्ही स्वीकारतो. पण त्यामुळे आम्ही केलेली सर्व मेहनत किंवा मिळवलेले यश विसरून चालणार नाही,'' असे त्यांनी सांगितले.

पत्रकार परिषद संपत आली असताना स्कालोनी यांच्या भावना अनावर झाल्या. बोलता बोलता त्यांचा कंठ दाटून आला, डोळ्यात अश्रू तरळले आणि ''मला खूप दु:ख होत आहे,'' एवढेच शब्द उच्चारत त्यांनी पत्रकार परिषद अर्धवट सोडली. स्कालोनी यांच्या या भावनिक क्षणाने उपस्थित पत्रकार आणि फुटबॉल चाहत्यांनाही हेलावून टाकले. अर्जेंटिनाला विश्वविजेतेपद मिळवून देणाऱ्या प्रशिक्षकाच्या डोळ्यातील अश्रूंनी पराभवाचे दु:ख किती खोलवर आहे, याची प्रचिती पुन्हा एकदा दिली.आता या पराभवानंतर अर्जेंटिना नव्या जोमाने पुनरागमन करण्यासाठी कशी तयारी करते आणि स्कालोनी आपल्या भवितव्याबाबत काय निर्णय घेतात, याकडे संपूर्ण फुटबॉलविश्वाचे लक्ष लागले आहे.

# नागरिकांना दर्जेदार सेवा उपलब्ध होण्यासाठी पायाभूत सुविधा निर्मितीवर भर : सहकार मंत्री बाबासाहेब पाटील

## अहमदपूर येथे महसूल अधिकारी व कर्मचारी निवासस्थान इमारतीचे भूमीपूजन

**लातूर/प्रतिनिधी:** सर्वसामान्य नागरिकांना शिक्षण, आरोग्य, सिंचन, वीज यांसारख्या दर्जेदार सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी राज्य शासन कटिबद्ध आहे. याकरिता विविध विकासकामांच्या माध्यमातून पायाभूत सुविधांच्या निर्मितीला सर्वोच्च प्राधान्य देण्यात येत असल्याचे प्रतिपादन सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी केले. अहमदपूर येथे १५ कोटी रुपये खर्चून उभारण्यात येणाऱ्या महसूल अधिकारी व कर्मचारी निवासस्थान इमारतीच्या भूमिपूजनप्रसंगी ते बोलत होते.

या कार्यक्रमास अहमदपूरच्या उपविभागीय अधिकारी मंजुषा लटपटे, नगराध्यक्ष ड. स्वप्नील व्हत्ते, अहमदपूर पंचायत समितीचे सभापती सुरज पाटील, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता बाबासाहेब थोरात, कार्यकारी अभियंता सुग्रीव केंद्रे, तहसीलदार उज्ज्वला



पांगारकर, उपविभागीय अभियंता सूरज गौंड, दिलीप देशमुख, बाबासाहेब कांबळे यांच्यासह पदाधिकारी, अधिकारी उपस्थित होते.

शेतकऱ्यांना कर्जमुक्त करण्यासाठी राज्य शासनाने अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना जाहीर केली आहे. लवकरच या योजनेचा प्रत्यक्ष लाभ शेतकऱ्यांना देण्यास सुरुवात होणार आहे. यासोबतच शेतकऱ्यांना मोफत वीज देण्याचा निर्णयही शासनाने घेतला आहे. समाजातील तळागाळातील घटकांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. अहमदपूर मतदारसंघातील शेतकऱ्यांना सिंचनासाठी दिवसा वीज मिळावी, याकरिता सौरकृषी पंप देण्यात येत असून नवीन विद्युत उपकेंद्र उभारणीस मंजुरी देण्यात आली आहे. तसेच ग्रामीण भागातील पाणीपुरवठ्याचा प्रश्न सोडवण्यासाठी सातत्याने पाठपुरावा सुरू आहे.

अहमदपूर शहरात विविध प्रशासकीय इमारतींची उभारणी होत असल्याचे सांगताना सहकार मंत्री श्री. पाटील म्हणाले की, पंचायत समिती व नगरपालिकेच्या माध्यमातून रस्ते विकासाची कामे हाती घेण्यात आली आहेत. यासोबत निर्माणाधीन इमारतींचे काम गतीने पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. शहरात सहकार भवन उभारण्यासाठी मान्यता मिळाली असून त्याचे कामही लवकरच सुरू होईल. नागरिकांना प्रशासकीय सुविधा देणाऱ्या महसूल विभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी १५ कोटी रुपये मंजूर झाले असून त्यातून २० निवासस्थानांचे बांधकाम केले जाणार आहे.

या प्रसंगी नगराध्यक्ष ॲड. स्वप्नील व्हत्ते, उपविभागीय अधिकारी मंजुषा लटपटे, बाबासाहेब कांबळे व दिलीप देशमुख यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता सुग्रीव केंद्रे यांनी केले, तर आभार प्रदर्शन मंडळ अधिकारी गोविंद कुंभार यांनी मानले.

# महाराष्ट्र सुवर्ण परिवार तर्फे भव्य लोन मेळावा

**सोलापूर/प्रतिनिधी:** महाराष्ट्र सुवर्ण परिवार हा सोनार समाजाचा एक राज्यव्यापी समूह असून समाज हिताला प्राधान्य देऊन समाजातील गरजवंतांसाठी विविध समाज उपयोगी उपक्रम राबवत असतो. आज पर्यंत या समूहाने अतिवृष्टी ग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत दिली होती. तसेच नोकरी करू इच्छिणाऱ्या समाजातील सुशिक्षित बेकार असणाऱ्या मुला मुलींसाठी रोजगार व नोकरी उपक्रम ही राबवला होता व त्यातून जवळपास नऊ-दहा मुला मुलींना विविध कंपन्यांमध्ये अरहतेनुसार नोकऱ्याही उपलब्ध झालेल्या आहेत. आणि नुकतेच समाजातील आर्थिक अडचणीत असलेल्या समाजबांधवांसाठी मोफत सामुदायिक उपनयन कार्यक्रम सोहळा ही आयोजित करून तो यशस्वीरित्या संपन्न झालेला आहे, या सोहळ्यातून राज्यातील विविध भागातील किमान अकरा.. बारा मुलांचे मुंजी त्याही विनाशुल्क व मोफत महाराष्ट्र सुवर्ण परिवार तर्फे मोठ्या दिमाखात यथासांग पार पडलेले आहेत व त्यासाठी राज्यभरातून संबंधित विविध हेचसमाज बांधवांकडून कौतुकास्पद धन्यवाद ही मिळालेले आहेत. अशा रीतीने समाज माझा व मी समाजाचा हे प्रमाणध्येय घेऊन समाजकार्यासाठीसदैव कार्यरत असणाऱ्या अग्रेसर समूहा ने आता राज्यभरातील समाजातील सोनार कारागीर घटक, व्यावसायिक, छोटे मोठे सराफ व्यावसायिक, किंवा इतर कुठलाही व्यवसाय करू इच्छिणारे समाजातील होतकरू गरजवंत व्यवसाय इच्छुक मुला-मुलींसाठी भांडवल उपलब्ध व्हावे म्हणून विविध वित्तीय संस्था, खाजगी व सरकारी बँका आणि शासकीय योजनेतून उपलब्ध असणाऱ्या विविध कर्ज योजना याद्वारे व्यवसाय इच्छुक मुला-मुलींसाठी भव्य लोन मेळावा लवकरच आयोजित करण्यात येणार असल्याचे या महाराष्ट्र सुवर्ण परिवार समूहाचे प्रवर्तक श्री रत्नाकर वेदपाठक यांनी सांगितले तसेच अशा लोन मेळाव्यातून व्यावसाकयिकयांनी समाज बांधवांना त्यांचे उद्योग व्यवसायासाठी रुपये एक लाख ते एक कोटी पर्यंत कर्ज भांडवल उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न या लोन मेळाव्यातून होणार आहे. समाजातील गरजवंतांना या मेळाव्याद्वारे जास्तीत जास्त लाभ व्हावा असा प्रयत्न व इच्छा असल्याचेही समूह प्रवर्तक रत्नाकर वेदपाठक यांनी अपेक्षा व्यक्त केली. विशेष करून समाजातील गरजवंतांसाठी या समूहा कडून यापुढेही असेच विविध समाजहितकारक उपक्रम कार्यक्रम सामूहिक प्रयत्नातून करण्याचा मनसुबा असल्याने या समूहा बद्दल समाज बांधवांमध्ये आपलेपणाचा विश्वास निर्माण झाला आहे.

# २३ जुलै रोजी वाखरी पंढरपूर येथे श्री समर्थ विष्णुदास वारकरी कुस्ती महावीर स्पर्धा; वारकर्यांसाठी अभिनव उपक्रम

**पुणे/प्रतिनिधी :** विश्व शांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटी, श्री क्षेत्र आळंदी-देहू परिसर विकास समिती आणि महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाच्या संयुक्त विद्यमाने गुरूवार, दि २३ जुलै २०२६ रोजी दुपारी १.३० ते संध्याकाळी ६.०० वाजेपर्यंत श्री समर्थ विष्णुदास वारकरी कुस्ती महावीर स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. ही स्पर्धा वाखरी, पंढरपूर येथील पालखी तळाच्या शेजारी विश्वशांती गुरुकुल परिसरात होणार आहे.

वारकर्यांनी जास्तीत जास्त संख्येने या स्पर्धेत सहभागी व्हावे, असे आवाहन माईर्स एमआयटी शिक्षण संस्था समूहाचे व्यवस्थापकीय विश्वस्त आणि कार्यकारी अध्यक्ष डॉ. राहुल विश्वनाथ कराड व वारकरी कुस्ती महावीर स्पर्धेच्या संयोजन समितीचे सचिव प्रा.विलास कथुरे यांनी केले आहे.

स्पर्धेचे उद्घाटन संत साहित्याचे गाढे अभ्यासक व उर्वरित महाराष्ट्र विकास महामंडळाचे माजी अध्यक्ष उल्हासदादा पवार, हिंद केसरी दिनानाथ सिंग व डबल महाराष्ट्र केसरी पै. हर्षवर्धन सदगीर हे सन्माननीय प्रमुख पाहुणे असतील. आमदार समाधान आवताडे, महाराष्ट्र केसरी पै. आप्पासाहेब कदम आणि महाराष्ट्र केसरी पै. विष्णूतात्या जोशीलकर सन्माननीय पाहुणे म्हणून उपस्थित राहतील.

अध्यक्षस्थानी श्री क्षेत्र आळंदी-देहू परिसर विकास समितीचे कार्याध्यक्ष विश्वधर्मी प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड हे असतील.

आयोजित स्पर्धेत सहभागी होण्यासाठी वारकरी मल्लांनी २३ जुलै २०२६ रोजी सकाळी ७.३० वा. विश्वशांती गुरूकुलच्या मुख्य प्रवेश द्वाराजवळ आपली नावे नोंदणी करावी. सोबत वयाचा पुरावा म्हणून आपले आधार कार्ड किंवा शासनमान्य ओळखपत्र ठेवावे. अधिक माहितीसाठी प्रा. विलास कथुरे मो. नं. ९८५०२११४०४ , आणि पै. राहुल बिराजदार मो. नं. ८००७५९३४३४ यांच्याशी संपर्क साधावा.

(प्रथम - सुवर्ण पदक, द्वितीय - रौप्य पदक, तृतीय - कांस्य पदक व रोख रक्कम) विशेष आकर्षण म्हणजे योगमहर्षी वै. रामचंद्र गोपाळ शेलार उर्फ शेलारमामा यांच्या स्मृति प्रित्यर्थ तंदुरूस्त अशा सत्तर (७०) वर्षे वयाच्या पुढील मल्लांसाठी याच दिवशी आगळी-वेगळी कुस्ती स्पर्धा होईल.

आयोजित स्पर्धा

| वयोगट | प्रथम क्रमांक | द्वितीय क्रमांक | तृतीय क्रमांक |
|---|---|---|---|
| १६ ते २५ वर्षे | रु. ४,०००/- | रु. ३,०००/- | रु. २,०००/- |
| २६ ते ३५ वर्षे | रु. ५,०००/- | रु. ४,०००/- | रु. ३,०००/- |
| ३६ ते ४५ वर्षे | रु. ६,०००/- | रु. ५,०००/- | रु. ४,०००/- |
| ४६ ते ५५ वर्षे, | रु. ७,०००/- | रु. ६,०००/- | रु. ५,०००/- |
| ५६ ते ६५ वर्षे | रु. ८,०००/- | रु. ६,०००/- | रु. ५,०००/- |
| ७० वर्षाच्या पुढे | रु. ५,०००/- | रु. ३,०००/- | रु. २,०००/- |

१६ ते २५ वयोगटातील विजेत्यास 'कुमार वारकरी कुस्ती महावीर' पुरस्कार, ५६ ते ६५ वयोगटातील विजेत्यास 'वारकरी कुस्ती महावीर' पुरस्कार आणि ७० वर्षांच्या पुढील विजेत्यास 'ज्येष्ठ वारकरी कुस्ती महावीर' पुरस्काराने सन्मानित करण्यात येईल. विजेत्या कुस्ती महावीरांचा सन्मान - मानाचा फेटा, माऊलींची/जगद्गुरुंची प्रतिमा, शाल, स्मृतिचिन्ह, सुवर्ण/रौप्य/कांस्य पदक व रोख रकमेची बक्षिसे देऊन गौरव करण्यात येणार आहे.

महाराष्ट्रातील लोककलेला संजीवनी मिळावी म्हणून याच दिवशी रात्री ८.०० ते ११.०० वाजेपर्यंत, वारकर्यांना अत्यंत प्रिय असलेल्या शांती ब्रह्म संत एकनाथ महाराजांचे प्रसिध्द असलेले नाथांचे भारूड व गवळणी यांच्या स्पर्धा घेण्यात येणार आहे.

# पेपरफुटीप्रकरणी शिक्षणमंत्र्यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारावी: जिजाऊ ब्रिगेडची राजीनाम्याची मागणी

**निलंगा/अयुब बागवान:** देशभरात विविध स्पर्धा परीक्षांमध्ये सातत्याने समोर येत असलेल्या कथित पेपरफुटीच्या घटनांमुळे विद्यार्थ्यांचा शिक्षण व्यवस्थेवरील विश्वास डळमळीत झाला असून, या प्रकरणाची नैतिक जबाबदारी स्वीकारत केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी जिजाऊ ब्रिगेड, निलंगा यांच्या वतीने करण्यात आली. यासंदर्भात तालुकाध्यक्ष सुनिता सूर्यवंशी यांच्या नेतृत्वाखाली उपविभागीय अधिकारी शरद झाडके यांच्यामार्फत केंद्र सरकारला निवेदन सादर करण्यात आले.

निवेदनात म्हटले आहे की, वैज्ञानिक, शिक्षणतज्ज्ञ आणि पर्यावरण कार्यकर्ते सोनम वांगचुक यांनी दिल्लीतील जंतर-मंतर येथे विद्यार्थ्यांच्या विविध शैक्षणिक प्रश्नांकडे केंद्र




सरकारचे लक्ष वेधण्यासाठी आंदोलन सुरू केले असून, त्या आंदोलनाला जिजाऊ ब्रिगेडने जाहीर पाठिंबा दर्शविला आहे. तसेच, छएएढ, ढएढ आणि इतर स्पर्धा परीक्षांमधील कथित पेपरफुटीच्या घटनांमुळे लाखो विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कारकिर्दीवर परिणाम झाल्याचा दावा निवेदनात करण्यात आला आहे.

शिक्षण क्षेत्रात पारदर्शक, विश्वासार्ह आणि भ्रष्टाचारमुक्त परीक्षा प्रणाली निर्माण करण्यासाठी केंद्र सरकारने तातडीने ठोस पावले उचलावीत, तसेच पेपरफुटीच्या घटनांमुळे आत्महत्या केलेल्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी एक कोटी रुपयांची आर्थिक मदत जाहीर करावी, अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली आहे.

निवेदनानुसार, दिल्लीतील आंदोलनकर्त्यांच्या प्रकृतीबाबत चिंता व्यक्त करण्यात आली असून, केंद्र सरकारने या आंदोलनाची तातडीने दखल घेऊन संवादाद्वारे प्रश्न मार्गी लावावेत आणि विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी संबंधित प्रश्नांवर सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

या निवेदनावेळी संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष प्रमोद कदम, जिजाऊ ब्रिगेडच्या तालुकाध्यक्ष सुनिता सूर्यवंशी, तालुका उपाध्यक्ष छाया बिरादार, तालुका सचिव रेखा ज्ञानेश्वर तोटाळे, मनीषा बालाजी भोपी, सुलक्षणा तानाजी भोपी, ऐश्वर्या धुमाळ, आशा सरवदे, सविता आर्य, सुलोचना कांबळे, शिवकन्या बिराजदार यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# स्वच्छतेच्या कामांची महापौरांकडून अचानक पाहणी; कर्मचाऱ्यांनी काळजी घेण्याच्या सूचना



**लातूर/प्रतिनिधी:** महापौर जयश्रीताई सोनकांबळे यांनी सोमवारी (दि. २० जून ) शहरातील झोन क्रमांक बी मध्ये अचानक भेट देऊन स्वच्छतेच्या कामकाजाची पाहणी केली. पावसाळ्याच्या दिवसात नागरिकांच्या स्वच्छतेबाबत तक्रारी येऊ नयेत, असे निर्देश देतानाच कर्मचाऱ्यांनी स्वतःच्या आरोग्याची काळजी घेण्याच्या सूचनाही त्यांनी केल्या.

सोमवारी महापौरांनी झोन बी मधील प्रभाग क्रमांक १५,१६,१७ व १८ मध्ये अचानक भेट दिली. या भागात सुरू असलेल्या स्वच्छतेच्या कामांची पाहणी केली. प्रभागात कोठेही पावसाचे पाणी थांबणार नाही,याची काळजी घ्यावी.कचरा साठवून राहू नये तसेच स्वच्छतेबाबत नागरिकांच्या तक्रारी येऊ नयेत याची काळजी घेण्याचे निर्देश त्यांनी दिले.

पावसाळ्याचे दिवस आहेत. स्वच्छतेची कामे करताना कर्मचाऱ्यांनी स्वतःचे आरोग्य सांभाळावे.सुरक्षिततेसाठी महानगरपालिकेच्या वतीने कर्मचाऱ्यांना गमबूट, हॅन्डग्लोव्हज व मास्क देण्यात आले आहेत. त्याचा वापर करावा, अशा सूचनाही त्यांनी केल्या.


यावेळी क्षेत्रीय अधिकारी रोहित पवार,मुख्य स्वच्छता निरीक्षक धोंडीराम सोनवणे यांच्यासह सर्व स्वच्छता निरीक्षक व कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती.

# सिरीजमध्ये स्मार्ट मीटर बसवून वीजग्राहकांचे समाधान

## चाकूरच्या १६० ग्राहकांनी स्मार्ट मीटर घेतले बसवून

**चाकूर/प्रतिनिधी :** स्मार्ट मीटर बसवण्यबाबत वीजग्राहकांच्या मनात असलेल्या विविध शंकांचे निरसन करण्यासाठी महावितरण अनेक उपाययोजना राबवत आहे. या पार्श्वभूमीवर महावितरणनच्या चाकूर उपविभागाने तातडीने सुसंवादाची भूमिका घेत रिडींग जास्त येत आहे या ग्राहकांच्या शंकांचे निरसन करण्यासाठी जुन्या मीटर सोबतच सिरीज मध्ये स्मार्ट मीटर लावत दोन्ही मीटरचे रिडींग सारखेच येते हे सिध्द करून दाखविल्यामुळे आठवडयाभरात १६० वीजग्राहकांनी स्मार्ट मीटर बसवून घेत महावितरणला सहकार्य केले.

मुख्य अभियंता अरविंद बुलबुले व अधीक्षक अभियंता प्रशांत दाणी यांच्या सुचनेनुसार चाकूर उपविभागामध्ये स्मार्ट मीटर बाबत शंकांचे निरसन करण्याच्या उपाय योजना करण्यात आल्या. तक्रार निवारण मेळाव्यासोबतच जूने मीटर व स्मार्ट मीटर मधील रिडींग मध्ये ग्राहकांव्या वापरानुसारच अचूक रिडींग येत असल्याचे सिरिज मीटर लावून सिध्द करून दाखविण्यात आले. ग्राहकांच्या शंकांचे निरसन होत असल्याने वीजग्राहक स्मार्ट मीटर बसवण्यास सहकार्य करत आहेत. सहाय्यक अभियंता अमोल मुखेडकर, कनिष्ठ अभियंता सुप्रिया पांडे, वडवळ शाखा अभियंता गोपाळ जोशी, सहाय्यक लेखापाल आनंद आचार्य, रवी गायकवाड, संदीप तिकटे, प्रतिक्षा चामवार यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या सुचनेनुसार चाकूर उपविभाग कार्यालया अंतर्गत ग्राहकांच्या भेटी, बैठका आयोजित करत बैठकीत स्मार्ट मीटरचे कार्य, त्याचे फायदे, पारदर्शक वीज वापर नोंद, अचूक बिलिंग आणि ग्राहकांसह महावितरणच्या हिताच्या दृष्टीने स्मार्ट मीटरचे महत्त्व सविस्तरपणे समजावून सांगण्यात आले. शंकांचे समाधान झाल्याने चाकूर शहरातील सत्यसाईबाबा रोड, परिसरातील १६० वीजग्राहकांनी स्मार्ट मीटर बसवून घेतले आहेत. ग्राहकांच्या वीज बिलासंदर्भातील शंका व तक्रारी ऐकून त्यांचे तत्काळ निराकरण करण्यात येत असल्याने व भविष्यात कोणत्याही ग्राहकाला चुकीचे किंवा अवास्तव वीज बिल आल्यास महावितरणचे अधिकारी व कर्मचारी तत्परतेने मदत करतील, अशी हमी देण्यात आल्याने महावितरणच्या या संवादात्मक व सकारात्मक भूमिकेमुळे चाकूर उपविभाग परिसरातील वीजग्राहकांनी स्मार्ट मीटर बसविण्यास सहकार्य करण्याची भूमिका घेतली आहे.




प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.




शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# प्रशासकीय कर्मचारी हेच संस्थेच्या भविष्याचे खरे सह-शिल्पकार : कुलगुरू डॉ. मनोहर चासकर

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर : महाराष्ट्र राज्य प्राध्यापक विकास संस्था (MSFDA), पुणे आणि दयानंद कला महाविद्यालय, लातूरच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष (IQAC) यांच्या संयुक्त विद्यमाने प्रशासकीय कर्मचाऱ्यांसाठी दि. २० ते २२ जुलै २०२६ या कालावधीत आयोजित त्रिदिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्घाटन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या हस्ते झाले.



यावेळी बोलताना कुलगुरू डॉ. चासकर म्हणाले की, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP 2020) प्रभावीपणे राबविण्यासाठी महाविद्यालयातील प्रशासकीय कर्मचाऱ्यांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. कार्यालयीन कामकाज अधिक कार्यक्षम, पारदर्शक, तंत्रज्ञानाधिष्ठित आणि विद्यार्थीकेंद्रित असणे ही काळाची गरज आहे. विद्यार्थी हा संस्थेच्या कार्याचा केंद्रबिंदू असल्याने त्याला गुणवत्तापूर्ण सेवा देण्यासाठी प्रशासकीय कर्मचाऱ्यांनी कार्यालयीन व्यवस्थापन, ई-ऑफिस, डिजिटल कौशल्ये, कृत्रिम बुद्धिमत्ता (AI), संवादकौशल्य, वेळेचे व्यवस्थापन, सेवाभाव आणि कार्यसंस्कृती यांचा सातत्याने विकास करणे आवश्यक आहे.

प्रशिक्षणामध्ये प्रत्येक सहभागीला वैयक्तिक स्वरूपातील कार्य (Task) देऊन त्याच्या कार्यकौशल्यात वृद्धी करण्यावर भर देण्यात यावा, असेही त्यांनी सांगितले. प्रशासकीय कर्मचारी हा केवळ संस्थेतील सहाय्यक नसून संस्थेचा धोरणात्मक भागीदार आणि संस्थेच्या भविष्याचा खरा सह-शिल्पकार आहे, असे प्रतिपादन त्यांनी केले. दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. लक्ष्मीरमणजी लाहोटी व सचिव मा. श्री. रमेश बियाणी यांच्या हस्ते कुलगुरू डॉ. मनोहर चासकर व उपस्थित मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. पी. गायकवाड होते. अध्यक्षीय समारोपात त्यांनी प्रशासकीय कर्मचाऱ्यांचे वित्तीय, वैयक्तिक, प्रशासकीय आणि तंत्रज्ञानविषयक कौशल्य विकसित करण्यासाठी अशा प्रशिक्षण कार्यक्रमांची आवश्यकता अधोरेखित केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक खट-उ संचालक प्रा. डॉ. संतोष पाटील यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. राजू मोरे यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. डॉ. सुनीता सांगोले यांनी केले.

यावेळी महाराष्ट्र राज्य प्राध्यापक विकास संस्थेचे प्रशासकीय विभागाचे कार्यकारी सहाय्यक श्री. राहुल पोखरकर व विकास केंद्राचे कार्यक्रम सहाय्यक श्री. आदित्य बच्चेवार प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच दयानंद शिक्षण संस्थेचे शैक्षणिक विकास अधिकारी डॉ. जयप्रकाश दरगड, दयानंद विधी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. पूनम नथानी, दयानंद विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सिद्धेश्वर बेल्लाळे, दयानंद वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर, दयानंद फार्मसी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. क्रांती सातपुते आणि दयानंद कला महाविद्यालयाच्या उपप्राचार्या डॉ. अंजली जोशी यांची प्रमुख उपस्थिती होती.

या प्रशिक्षण कार्यक्रमात महाविद्यालयातील ४० प्रशासकीय कर्मचाऱ्यांनी सहभाग नोंदविला.

## लातूर जिल्ह्यात २२ जुलैपासून विधानसभा मतदारसंघनिहाय छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिरांचे आयोजन

**लातूर/प्रतिनिधी :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त, तसेच माजी उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीचे औचित्य साधून लातूर जिल्ह्यातील सर्व विधानसभा मतदारसंघांमध्ये २२ जुलै, २०२६ पासून छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर आयोजित करण्यात येणार आहेत. याबाबतच्या तारखा जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत जाहीर करण्यात आल्या आहेत.

या शिबीराच्या माध्यमातून नागरिकांच्या महसूल विषयक तक्रारी स्वीकारणे, विविध प्रमाणपत्रे वाटप करणे, सामाजिक अर्थसहाय्य योजनेतंर्गत लाभ मंजूर करणे, ई-केवायसी करणे, नवीन व दुय्यम डिजिटल शिधापत्रिका देणे, पाणंद रस्त्यांच्या दुतर्फा वृक्षलागवड करणे, फार्मर आयडी देणे, डिजिटल सातबारा वाटप करणे, विमुक्त भटक्या जाती-जमातींसाठी प्रमाणपत्रे वाटप करणे, आभा कार्ड वाटप करणे, मोजणी



विषयक अर्ज स्वीकारणे व मोजणी शीट (क-प्रत) वाटप करणे तसेच आधार कार्ड दुरुस्ती व अद्ययावत करणे यांसारख्या विविध सेवा पुरवल्या जाणार आहेत. केंद्र व राज्य शासनाच्या विविध विभागांच्या म्हणजेच आरोग्य, कृषी, जिल्हा परिषद, भूमी अभिलेख आणि नगरपालिका प्रशासन विभागाच्या योजनांचे लाभ व सेवा हक्क कायद्यानुसार दिल्या जाणाऱ्या सेवा एकाच छताखाली उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत.

लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघात २२ जुलै, २०२६ रोजी रेणापूर येथील रेणुकाई मंगल कार्यालय येथे; उदगीर विधानसभा मतदारसंघात २२ जुलै, २०२६ रोजी उदगीर तालुक्यातील लोहारा शिवशंकर मंगल कार्यालय येथे; निलंगा विधानसभा मतदारसंघात २२ जुलै, २०२६ रोजी निलंगा येथील केतकी मंगल कार्यालय येथे; औसा विधानसभा मतदारसंघात २२ जुलै, २०२६ रोजी किल्लारी येथे; लातूर शहर विधानसभा मतदारसंघात २४ जुलै, २०२६ रोजी लातूर येथील पार्वती मंगल कार्यालय येथे आणि अहमदपूर विधानसभा मतदारसंघात ३१ जुलै, २०२६ रोजी अहमदपूर येथील सावता माळी मंगल कार्यालय येथे शिबीरांचे आयोजन करण्यात येणार आहे. या सर्व शिबीरांचा जिल्ह्यातील नागरिकांनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन लातूरचे जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी केले आहे.

## एचएसआरपी न बसविलेल्या वाहनांवर दंडात्मक कारवाई सुरु;वाहनांच्या पुनर्नोंदणीसह सर्व कामकाज थांबविले

**लातूर/प्रतिनिधी :** १ एप्रिल, २०१९ पूर्वी नोंदणी झालेल्या सर्व वाहनांना उच्च सुरक्षा नोंदणी पाटी (एचएसआरपी) बसविण्याची अंतिम मुदत ३० जून, २०२६ पर्यंत देण्यात आली होती. ही मुदत संपल्यानंतर आता १ जुलै, २०२६ पासून एचएसआरपी न बसविलेल्या वाहनांवर मोटार वाहन कायद्यानुसार दंडात्मक कारवाई सुरु करण्यात आली आहे. अशा वाहनांचे पुनर्नोंदणीसह सर्व कामकाज थांबविण्याचे निर्देश देण्यात आले आहेत, अशी माहिती लातूरचे उपप्रादेशिक परिवहन अधिकारी अमरसिंह गवारे यांनी दिली आहे.

केंद्रीय मोटार वाहन नियम १९८९ च्या नियम ५० नुसार वाहनांना एचएसआरपी पाटी बसविणे बंधनकारक आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार १ एप्रिल, २०१९ पूर्वीच्या वाहनांना पाटी बसविण्यासाठी ३० जून, २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. या कालावधीत पाटी न बसविलेल्या वाहनांचे हस्तांतरण, पत्ता बदलणे, कर्जबोजा चढविणे यांसारख्या सेवांवर आधीच निर्बंध लादण्यात आले होते.

यापुढे एचएसआरपी न बसविलेल्या वाहनांची पुनर्नोंदणी, वाहनात बदल करणे, परवाना नूतनीकरण यासह सर्व प्रकारची कामे (योग्यता प्रमाणपत्र नूतनीकरण वगळून) पूर्णपणे थांबविण्यात येत आहेत. तसेच १ जुलै, २०२६ पासून अशा वाहनांवर मोटार वाहन कायदा १९८८ च्या कलम ५०/१७७ नुसार कारवाई करण्यात येत आहे. ज्या वाहनधारकांनी ३० जून, २०२६ पर्यंत एचएसआरपी बसविण्यासाठी अधिकृतपणे आगाऊ नोंदणी केली आहे, अशा वाहनांना तूर्तास दंडात्मक कारवाईतून सूट देण्यात येणार आहे. तरी ज्यांनी अद्याप नोंदणी केलेली नाही, त्या सर्व वाहनधारकांनी अधिकृत फिटमेंट सेंटरकडून आपल्या वाहनांना लवकरात लवकर एचएसआरपी पाटी बसवून घ्यावी, असे आवाहन उपप्रादेशिक परिवहन अधिकारी श्री. गवारे यांनी केले आहे.

## निलंगा पंचायत समिती 'सभापती पती' प्रकरणाची चौकशी करण्याची वंचितची मागणी

**निलंगा/मोईज सितारी :** निलंगा पंचायत समिती कार्यालय परिसरातील उपोषणस्थळी पंचायत समितीच्या सभापती यांच्या पतींनी कोणतेही वैधानिक अथवा अधिकृत पद नसताना अधिकृत व्यक्तीप्रमाणे वावर केल्याचा आरोप करत या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून भारतीय न्याय संहिता, २०२३ तसेच लागू असलेल्या इतर कायद्यांनुसार आवश्यक फौजदारी व प्रशासकीय कार्यवाही करण्याची मागणी वंचित बहुजन महिला आघाडी व वंचित बहुजन आघाडीने केली आहे.



यासंदर्भात गटविकास अधिकारी, पंचायत समिती निलंगा यांना निवेदन सादर करण्यात आले. निवेदनात, उपोषणस्थळी संबंधित व्यक्ती उपोषणकर्ते, प्रशासन आणि उपस्थित नागरिकांशी अधिकृत पदाधिकारी असल्याचा आभास निर्माण होईल अशा पद्धतीने संवाद साधताना दिसल्याचा दावा करण्यात आला आहे. या घटनेचे व्हिडिओ व ध्वनिचित्रफिती समाजमाध्यमांवर प्रसारित झाल्याचेही नमूद करण्यात आले आहे.

निवेदनात पुढे म्हटले आहे की, या प्रकरणाची वस्तुनिष्ठ चौकशी करून आवश्यक असल्यास भारतीय न्याय संहिता, २०२३ तसेच लागू असलेल्या इतर कायद्यांनुसार योग्य ती कार्यवाही करण्यात यावी. तसेच चौकशी अहवाल विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, लातूर आणि मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांच्याकडे पाठविण्याची मागणी करण्यात आली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांना संविधानाने दिलेल्या अधिकारांचा सन्मान राखला जावा आणि 'प्रधानपती' किंवा 'सरपंचपती' स्वरूपाच्या अनधिकृत हस्तक्षेपास प्रतिबंध घालण्यासाठी प्रशासनाने ठोस भूमिका घ्यावी, अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली आहे.

दरम्यान, या निवेदनावर योग्य कालावधीत कार्यवाही न झाल्यास वंचित बहुजन महिला आघाडी व वंचित बहुजन आघाडीच्या वतीने लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

हे निवेदन सौ. मंजू हिरालाल निंबाळकर (जिल्हाध्यक्ष, वंचित बहुजन महिला आघाडी, लातूर), देवदत्त सूर्यवंशी (तालुका प्रभारी, वंचित बहुजन आघाडी, निलंगा) आणि डॉ. हिरालाल गणपतराव निंबाळकर यांनी सादर केले.

या प्रकरणातील आरोप हे निवेदनातील असून त्याबाबत संबंधित व्यक्ती किंवा प्रशासनाची अधिकृत भूमिका अद्याप प्राप्त झालेली नाही.

## विठाई ..

यंदामात्र छान सोयी
वारी आपली पायी
जमले पंढरीस जाणे
दरवेळी चुकलीजाई
नमवले शांतमस्तक
पांडुरंगा तुझ्या पायी
देखले मुख कमला
गा विठोबा रुखमाई
पंढरीनाथा तू सर्वत्र
व्यापलेला ठाई ठाई
मूर्त रूपातली मुर्ती
आवडी मज विठाई
नाथा तूच सर्वव्यापी
नाम स्मरणा मलाई
तरी रे पंढरी वारीची
आगळी बा नवलाई
हंबरतय तुझे वासरु
लपल्या कुठे रे गाई
निंद्रा स्वप्न वत होई
रे कोण गाई अंगाई
मी ना मुक्ताईजनाई
नसे मिराई रूकमाई
तरीही बोलवे जवळ
बनलांस मम विठाई
तहानलो दर्शनास्तव
तुचि होशी पाणपोई
तृषा पुरी आता होई
मनलीन तल्लीनपाई

**हेमंत मुसरीफ पुणे**
९७३०३०६९९६

## एमटीएस परीक्षेत साने गुरुजी विद्यालयाचे यश



**लातूर/प्रतिनिधी :** राज्यस्तरीय महाराष्ट्र टॅलेंट सर्च स्पर्धा परीक्षेत लातूरच्या साने गुरुजी प्राथमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी राज्याच्या गुणवत्ता यादीत स्थान मिळवून देदीप्यमान कामगिरी केली आहे. या यशस्वी विद्यार्थ्यांचा आणि त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचा सत्कार सोहळा विद्यालयात उत्साहात पार पडला. अध्यक्षस्थानी प्रशासकीय अधिकारी जी. टी. माने होते. तर प्रमुख अतिथी म्हणून सचिव कालिदास माने, शंभुलिंग नागुरे, पालक प्रतिनिधी पंकज मुगावे व मुख्याध्यापक पांडुरंग केंद्रे उपस्थित होते.

याप्रसंगी मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांना मुख्याध्यापकांच्या हस्ते प्रत्येकी १,१०० रोख पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. यामध्ये संगीता मुळे, श्रीकांत गायकवाड, मोरे रविकांत, शीतल रोकडे, मीना माने आणि रोहिणी सुरवसे यांचा समावेश होता. सुतार साई, काळे सोहम, मुगावे भाग्यश्री, पाटील दिव्या, कराडे समर्थ आणि साबणे मनुश्री या गुणवंत विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्र व मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. सूत्रसंचालन शिवकांता मुर्गे यांनी केले, तर आशिष विजापुरे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

**www.latursamachar.com वर रोज वाचा ऑनलाईन....**


### CHANGE IN NAME

HERE IN THIS ADVERTISEMENT, I AM DECLAING THAT I HAVE CHANGED MY NAME WHICH WAS EARLIER: KAZI AAFREEN TO: AAFREEN MUZAMMIL ABDUL MUJEEB KAZI HENCE FOR THIS DECLARATION I WILL BE KNOWN BY THIS NAME AND WILL USE AAFREEN MUZAMMIL ABDUL MUJEEB KAZI IN FUTURE THE SAME NAME WILL BE USED BY MY FAMILY HUSBAND / WIFE, CHILDREN AND RELATIVE.
**OLD NAME:** KAZI AAFREEN
**NEW NAME:** AAFREEN MUZAMMIL ABDUL MUJEEB KAZI
**ADDRESS:** H-3737/1 MOHAMMADIYA MASJID MOHAMMADIYA COLONY ABDUL HAMID CHOWK BARSHI ROAD,LATUR PIN:413531,MAHARASHTRA, INDIA

### CHANGE IN NAME

HERE IN THIS ADVERTISEMENT, I AM DECLARING THAT I HAVE CHANGED MY NAME WHICH WAS EARLIER: KAZI ARSHAD ABDUL AZEEM
TO: ARSHAD ABDUL AZEEM ABDUL BASIT KAZI
HENCE FOR THIS DECLARATION I WILL BE KNOWN BY THIS NAME AND WILL USE
ARSHAD ABDUL AZEEM ABDUL BASIT KAZI
IN FUTURE THE SAME NAME WILL BE USED BY MY FAMILY HUSBAND / WIFE, CHILDREN AND RELATIVE.
**OLD NAME:** KAZI ARSHAD ABDUL AZEEM
**NEW NAME:** ARSHAD ABDUL AZEEM ABDUL BASIT KAZI
**ADDRESS:** MOHOMDIYA COLONY PRAKASH NAGAR BARSHI ROAD, LATUR
PIN:413531, MAHARASHTRA,INDIA.

### CHANGE IN NAME

HERE IN THIS ADVERTISEMENT, I AM DECLAING THAT I HAVE CHANGED MY NAME WHICH WAS EARLIER: KAZI AKHTAR BEGUM TO: AKHTAR BEGUM ARSHAD ABDUL AZEEM KAZI
HENCE FOR THIS DECLARATION I WILL BE KNOWN BY THIS NAME AND WILL USE AKHTAR BEGUM ARSHAD ABDUL AZEEM KAZI IN
FUTURE THE SAME NAME WILL BE USED BY MY FAMILY HUSBAND / WIFE, CHILDREN AND RELATIVE.
**OLD NAME:** KAZI AKHTAR BEGUM
**NEW NAME:** AKHTAR BEGUM ARSHAD ABDUL AZEEM KAZI
**ADDRESS:** MOHOMDIYA COLONY PRAKASH NAGAR BARSHI ROAD,LATUR.PIN:413531,MAHARASHTRA, INDIA

### Name of change Declaration

Here in this advertise i am declaring that i have change My Name which was : KAZI TABASSUM BEGUM NASIRODDIN TO TABASSUM NASRODDIN KAZI.
Hence for this Declaration i will be known by this name and will use . In future the will used by my family husband /wife, children and relative.
**OLD NAME :** KAZI TABASSUM BEGUM NASIRODDIN.
**NEW NAME:** TABASSUM NASRODDIN KAZI.
Address : AT POST. BORI. TQ. DIST. LATUR -413524
**AADHAR NO.-** 401560056465
**Mob. No.-** 976464436774


### जाहीरनामा

**दिवाणी अ.१५० म**

**लातूर येथील ४ थे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर, लातूर यांच्या न्यायालयात वारसाचे प्रमाणपत्र मिळणे बाबत**

वारसा प्रमाणपत्र अर्ज क्र. १११७/२०२६

**(सुशिला व इतर वि. निरंक निशाणी क्रमांक ०६)**

ज्यापेक्षा मयत **पदमीनीबाई नरसिंगराव शिंदे,** हे **दि.** २२/०६/२०२६ रोजी लातूर एम.सी.आय. ता. जि.लातूर येथे मयत झाले असून,

अर्जदार,

**१.सुशिला भ्र. मोहनराव शिंदे. वय : ५६ वर्ष धंदा :घरकाम**

**२. भाग्यश्री पि. मोहनराव शिंदे. वय: ४० धंदा: घरकाम**

**दोघे रा. खाडगाव रोड, संभाजीनगर ता.जि. लातूर**

यांनी मयताच्या पश्चात मयताचे कायदेशीर वारस या नात्याने शासकिय निमशासकिय कामासाठी अर्जदारांना वारस प्रमाणपत्राचे आवश्यकता आहे. त्यामुळे अर्जदार यांनी मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज केला आहे. असलेबाबत या न्यायालयात अर्ज केलेला आहे.

त्यापेक्षा उपरोक्त अर्जदार हे सदरहु कायदेशीर वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर हा जाहीरनामा प्रसिद्ध झालेल्या तारखेपासून एक महिण्याच्या आत त्याने कोर्टात हजर राहून आपल्या हरकती कळवाव्यात. या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखवल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे वारसाबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्याचा वारस शाबीत दिसल्यास त्यांला सदरहू मयत **पदमीनीबाई नरसिंगराव शिंदे** यांचे वरील नमुद अर्जकदार यांना कायदेशीर वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

तारीख **२० माहे ०७ सन २०२६**
**पुढील तारीख ०८.०९.२०२६**

आदेशावरून

शिक्का

**सहा. अधिक्षक**
दिवाणी न्यायालय व. स्तर. लातूर.

स्वाक्षरित/-
**(डी. ए. गुंड)**
क. लिपीक
४ थे सह दि.न्या.व स्तर, लातूर

Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade Mo. 9422472502, RNI 47034/64, POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26

हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे. मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२ आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी-५२/२४-२६